रवींद्र पिंगे यांचे लेखन साप्ताहिक वृत्तपत्राला आवश्यक असलेला चटकदारपणा कायम ठेवून वाचकाला थोडे खोल नेते. त्यांचे मन:पूर्वक अभिनंदन. मुक्त मनाने व सरस शैलीने विविध विषय हाताळण्याचा हा काळ आहे. पिंगे यांनी काळाची ही नाडी ओळखली आहे. त्यांचे लेखन नवनव्या विषयांना स्पर्श करीत जाईल अशी आशा आहे.

वि. स. खांडेकर

[‘माणूस’ला लिहिलेले पत्र–११-८-७१]



---


# माणूस

शनिवार । २८ ऑगस्ट १९७१

पन्नास पैसे


---

या अंकातील नवा विषय ?

## सॉमरसेट मॉम



| | | | |
|---|---|---|---|
| माणूस | शनिवार | २८ ऑगस्ट १९७१ | पन्नास पैसे |
| वर्ष | अंक | वार्षिक वर्गणी | परदेशची वर्गणी |
| अकरा | तेरा | पंचवीस रुपये | पंचेचाळीस रुपये |

# माणूस

| | |
|---|---|
| संपादक | सहाय्यक |
| श्री. ग. माजगावकर | दिलीप माजगावकर |
| | सौ. निर्मला पुरंदरे |


**सप्रेम नमस्कार ..**

◻ आपला १४ ऑगस्टचा माणूस वाचला. आपल्या नेहमीच्या परंपरेस साजेसा आहे. 'पाटीलवाडी पाडळदे आणि शहादे' हा लेख चिंतनीय आहे. इतर सर्व राज्यांपेक्षा पुरोगामी असल्याचा दावा करणाऱ्या व गोरगरिबांचा कळवळा असणाऱ्या महाराष्ट्र सरकारचा बुरखा फाडला हे चांगले झाले. सरकारी अधिकारी अशा वेळी कसे वागतात हेही समजले. न्यायाधीशाविरुद्ध आवाज उठविणारे खासदार सनदी नोकरांच्या वा सरकारी अधिकाऱ्यांच्या अधिकारावर मर्यादा आणण्यासाठी का प्रयत्न करीत नाहीत? नरेशांचे तनखे रद्द करण्यासाठी कडक कारवाई करणारे शासन मधु लिमयांचे पूर्वी फेटाळलेले गेलेले सनदी नोकरांचे विशेष हक्क रद्द करणारे बिल लोकसभेत का आणीत नाहीत? सरकार वा लोकनेते माजल्यास जनता त्यांना नाकारू शकते. त्यांना निवडणुकीचा धाक असतो. पण नोकरांना काहीही करता येत नाही. कर्तव्यात कसूर केल्यावर कडक शिक्षा होत नाहीत. म्हणूनच लोकांची कामे सुलभतेने न करणे, त्यांच्या गाऱ्हाण्यांना, अन्यायांना भीक न घालणे हाच त्यांचा स्थायीभाव आढळतो. 'दारिद्र्याच्या थपडा खात माणूस स्वाभिमानाने जगण्याचा प्रयत्न करीत असताना त्याला कायद्याच्याही थपडा मिळू लागल्या की, तो सराईत गुन्हेगार होतो' असे डॉ. लोहियांनी म्हटले होते. Law & Order वाले अशाप्रकारे माणसाना गुन्हेगार बनवीत नाहीत काय?

वास्तविक अशा बातम्या जनतेपुढे प्रथम यायला हव्यात. अशा घटनांची

साप्ताहिक माणूस : १०२५ सदाशिव, पुणे ३० : दूरध्वनी : ५७३५९

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे काल्पनिक.

माहिती सर्वांना मिळावी यासाठी वृत्तपत्रे. आज वृत्तपत्र स्वातंत्र्याचा पुकार करणारे अशा घटनांची दखल घेत नाहीत याला काय म्हणावे? टिळक आगरकरांचा वारसा नुसताच सांगितला जातो. मंत्र्यांची तीच ती भाषणे व फोटो छापले जातात. सरकारी जाहिरातीसाठी गोंडा घोळणाऱ्यांकडून दुसरी काय अपेक्षा असणार? वृत्तपत्र स्वातंत्र्याचे हक्क मागून मिळतील काय? की ते प्रस्थापित करावे लागतील? याचा प्रथम विचार झाला पाहिजे.

आदिवासींवर झालेल्या अन्यायांचे, त्यांच्या क्रोधाचे योग्य मूल्यमापन करून आपण आमच्यासमोर स्पष्ट चित्र उभे केले आहे.

तसेच यातून नक्षलवाद येणे कसे शक्य व त्यास कशी अनुकूल परिस्थिती आहे हे दाखवून त्यावर मार्ग कोणता? हे सांगितल्यामुळेच लेख चिंतनीय झाला आहे. ही सर्व माहिती आम्हा वाचकांना दिल्याबद्दल अभिनंदन!

विदेश वार्ता, चलेजावच्या स्मृती, बर्मा फ्रंट व नगरवाला प्रकरण नेहमीप्रमाणेच लाजवाब!

माणूसने नेहमीच्या प्रथेप्रमाणे वाचकांच्या अपेक्षा पुरविल्या आहेत. आणि वाढविल्याही आहेत.

१९ ऑगस्ट, १९७१ — विलास पाटील, सोलापूर

□ माणूसचा १४ ऑगस्टचा अंक पोस्टमनने आणून दिला. आतुरतेने वाट पाहातच होतो. सहज चाळून पाहिला. स्वातंत्र्यदिनाच्या कार्यक्रमाच्या गडबडीत वाचणे जमले नाही. सोमवारी मुद्दाम रजा घेऊन संपूर्ण अंक वाचून काढला 'पाटीलवाडी पाडळदे आणि शहादे' हा लेख तर तीन वेळा वाचून काढला.

रवींद्र पिंगे यांचा 'शतपावली' व कर्नल जाधव यांचा 'बर्मा फ्रंट' हे दोन्हीही लेख खूप आवडले. 'नगरवाला प्रकरण'ने मात्र अपेक्षा भंग केला. वर्तमान पत्रातून प्रसिद्ध झालेल्या बातम्यांतून जेवढी माहिती मिळाली होती त्यापेक्षा वेगळे असे विशेष काहीच नव्हते.

श्री. माजगावकरांचा 'पाटीलवाडी पाडळदे आणि शहादे' हा लेख मात्र अस्वस्थ करून सोडणारा आहे. स्वातंत्र्य मिळून चोवीस वर्षे झाली तरीसुद्धा आदिवासी-समाज साध्या अन्नाला मोताद असावा, त्याच्या आयाबहिणींना मानाचे जिणे जगता येऊ नये, साधा न्याय मिळू नये ही गोष्ट खरोखरच लांछनास्पद आहे. शासनाने आणि समाजानेदेखील या गोष्टीचा गंभीरपणे विचार करायला हवा. 'आम्ही कुठपर्यंत सहन करावे?' व 'पर या समाजाने का हिंदू म्हणून हिंदुस्थानात राहावे?' या अंबरसिंगने मुख्यमंत्र्यांना विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे देण्याची जबाबदारी केवळ शासनावरच नव्हे तर हिंदुसमाजावरदेखील आहे.

नागा प्रदेशाबाबत ४० वर्षांपूर्वी स्वा. सावरकरांनी दिलेला सावधानतेचा इशारा

हिंदुसमाजाने दुर्लक्षिला. त्याचे दुष्परिणाम आज अनुभवास येत आहेत. आदिवासी गिरीजन व हरीजन यांच्या बाबतीत हिंदु समाजात असलेली उपेक्षा व अनास्था या देशाला कोठे नेऊन सोडणार आहे कुणास ठाऊक.

श्री. माजगावकर यांनी या प्रश्नाचा सखोल व वस्तुनिष्ठ अभ्यास करून याबाबतीतील सत्य परिस्थिती जनतेसमोर ठेवून फार मोठी कामगिरी पार पाडली आहे.

या लेखामुळेतरी सातपुड्यातील भिल्लांचे प्रश्न सोडविण्याची इच्छा राज्यकर्त्यांना व सामाजिक कार्यकर्त्यांना झाली तर आपले श्रम सार्थकी लागतील.

१७ ऑगस्ट, १९७१ — रा. दा. अबेकर, आंबाजोगाई

□ श्री. वि. वि. शेणवाई, नागपूर, यांचे ऑगस्ट, ७, १९७१ च्या अंकातील 'लखनौ-करार व प्रा. कुरुंदकर' या मथळ्याखालील पत्र वाचले.

काँग्रेसचा जन्म १८८५ साली झाला. १८८७ साली मुसलमानांनी लखनौ येथे स्वतंत्र मेळावा भरविला. या मेळाव्यांत सर सय्यद अहमद यांनी हिंदुस्तानात हिंदु आणि मुसलमान अशी दोन राष्ट्रे असल्याचा अभिप्राय दिला. फाळणीचा गर्भसंभव ह्याचवेळी झाला. १९१६ च्या लखनौ करारानं त्याचा गर्भपात करण्याचा प्रयत्न झाला. सर सय्यद अहमद यांच्या उद्‌गारानंतर ६० वर्षांनी पाकिस्तानचा जन्म झाला.

फाळणीचा विचार करताना या साठ वर्षांचे कोणकोणते कालखंड कोणकोणत्या व्यक्तिमत्वामुळे प्रभावित झाले होते हे पहाणे महत्त्वाचे आहे. पहिला कालविभाग १८८७ ते १९०७, सुमारे २० वर्षांचा; दुसरा १९०८ ते १९२०, १२ वर्षांचा; आणि तिसरा १९२१ ते १९४७, २६ वर्षांचा. तिसरा कालखंड पहिल्या दोहोंच्या मानाने मोठा आणि म. गांधींच्यामुळे अधिक प्रभावशाली. पहिल्या दोन कालखंडातील व्यक्तींचा प्रभाव हा म. गांधीजींशी तुलना करता तितकासा परिणामकारक ठरत नाही. कारण बहुजन समाजाने गांधीजींचा शब्द धर्मवाक्य म्हणून पाळलेला आहे. आणि धर्मवाक्य म्हणजे द्वयर्थी शब्दांचा धूर्त खेळ नव्हे.

प्रा. कुरुंदकरांनी फाळणीच्या संदर्भात जी विधाने केलेली आहेत, ती पूर्वग्रहांनी जखडलेली असल्याने फाळणीच्या समस्येकडे त्यांनी डोळसपणे पाहिलेले नाही. 'जागर'च्या प्रस्तावनेत ते म्हणतात, 'अभ्यास सोडून राजकारणाकडे वळल्याचे जे काही बरे वाईट परिणाम होत असतात तसे माझ्यावर झालेले आहेत.' फाळणीचे विश्लेषण करताना यापैकी कोणता परिणाम त्यांना मार्गदर्शन करीत होता?

एखाद्या कालखंडात लोकांना जी गोष्ट योग्य व सोईस्कर वाटेल ती कदाचित् त्यांच्या पुढच्या पिढीतील लोकांना वाटणारही नाही आणि म्हणूनच १९२१ ते १९४७ या कालखंडातील लोकांना काय हवे होते ते ठरवायचे कोणी? त्या काळात जिवंत असलेल्या लोकांनी की पूर्वी मरून गलेल्यांनी?

९ ऑगस्ट १९७१ — व. प्र डेंगळे, कोल्हापूर

रवींद्र पिंगे

# सॉमरसेट मॉम आणि त्याची आजी ॲन

सॉमरसेट मॉमचं नाव हे इंग्रजी साहित्यातलं हुकूमाचं पान आहे. सरस्वती त्याच्यावर अक्षरशः फिदा होती. जिथे जिथे म्हणून इंग्रजी साहित्याचा बाहुटा फडफडला, तिथे तिथे मॉमच्या नावाचा गजर झाला. मॉम हा जन्मजात भटक्या होता. त्याच्या साहित्यानेही निर्मात्यासारखाच जगभर स्वैरसंचार केला. जगातल्या बहुतेक प्रमुख भाषांत त्याच्या कथा-कादंबऱ्यांची आणि विशेषतः नाटकांची रूपांतरं झाली. आपल्याकडेसुद्धा माधव मनोहर, पु. ल. देशपांडे, शरश्चंद्र गुप्ये, लीला चिटणीस, पंढरीनाथ रेगे वगैरे ठळक लेखकांनी मॉमच्या लेखनाला मराठी पेहेराव दिलेला आहे. अठराशे चौऱ्याहत्तर ते एकोणीसशे पासष्ट असं ब्याण्णव वर्षांचं प्रदीर्घ आयुष्य त्याला लाभलं. विन्स्टन चर्चिल, बर्ट्रांड रसेल, ई. एम. फॉर्स्टर, ह्या नव्वदी ओलांडलेल्या त्याच्या समकालीन साहित्यिकांप्रमाणेच, आयुष्याची साठ वर्षं मॉमने सतत सकस लेखन करण्यात घालविली. त्याचं पहिलं पुस्तक प्रसिद्ध झालं त्यावेळी थॉमस हार्डी हा वाङ्मयीन क्षितिजावर तळपत होता. त्याच्या शेवटच्या पुस्तकाची सोबत सध्याचं चलतीतलं नाणं जॉन ऑसबोर्न ह्याने केली. म्हणजे इंग्रज लेखकांच्या चार पिढ्या लेखन करण्यात मग्न होत्या त्या प्रत्येक वेळी मॉम निरनिराळी पुस्तकं लिहीतच होता. 'ऑफ ह्यूमन बाँडेज,' 'मून अँड सिक्स पेन्स', 'रेझर्स एज', 'केक्स अँड एल', ह्या चार दिग्विजयी कादंबऱ्या; 'सेक्रेड फ्लेम', 'सर्कल,' 'अवर बेटर्स' ही विलक्षण लोकप्रिय नाटकं; 'समींग अप',

'ए रायटर्स नोटबुक', 'वर्ल्डस् ग्रेटेस्ट नॉव्हेल्स', 'ॲन इन्ट्रोडक्शन टू इंग्लीश ॲंड अमेरिकन लिटरेचर', आणि नाटकांच्या सहा खंडांना नाट्यरचनाशास्त्रावर लिहिलेल्या सहा प्रदीर्घ प्रस्तावना, हे त्याचं प्रमुख लेखन. इंग्रजी लघुकथालेखकांचा तर तो राजाच होता. शिवाय त्याने चित्रपटलेखनही अगदी समरसून केलं. टेलिव्हिजनचं नवं क्षेत्र त्याच्या गुप्त हेरांच्या कथांनी गाजवून सोडलं. साहित्यात त्याने काही चोखंदळ आग्रह धरले, जे आज अचूक वाटतात. उदा. जुन्या गाजलेल्या कादंबऱ्यांतला पाल्हाळवजा दोषी भाग कापून, फारसा वेळ गाठीशी नसलेल्या रसिक वाचकांच्या नव्या पिढीपुढे त्या अक्षर कलाकृतींच्या संक्षेपित, आटोपशीर आवृत्याच ठेवल्या पाहिजेत, असा त्याने जन्मभर हेका धरला. ह्याची सुरुवात त्याने स्वतःपासूनच केली. मूळची पाचशे पानांची स्वतःची 'ऑफ ह्यूमन बॉंडेज' त्याने छाटून छाटून दीडशे पानात मांडून ती अधिक चटकदार केली आहे. स्कॉट, टॉलस्टॉय, बॅलझॅक, झोला, ह्या सर्वांच्या कादंबऱ्या दिड-दोनशे पानात संक्षिप्त करून द्या असा घोषा त्याने लावला. आजकाल वाचकांना वाचायला वेळ फार कमी मिळतो, म्हणून त्यांच्यासाठी त्याने निवडक दहा कादंबऱ्या घेऊन त्यांचे प्रज्ञाशाली रसग्रहण आणि त्यांच्या निर्मात्यांच्या कलंदर जीवनाची मोठी चविष्ट ओळख त्याने 'टेन नॉव्हेलिस्टस् ॲंड देअर नॉव्हेल्स'मध्ये केली आहे. त्यांच्यामते, फ्रान्सचा बालझॅक हा जगातला सर्वश्रेष्ठ कादंबरीकार असून, टॉलस्टॉयची दोन हजार पानांची 'वॉर ॲंड पीस' ही विश्वसाहित्यातील सर्वश्रेष्ठ कादंबरी आहे. पोटदुखी असणाऱ्या टिकाकारांची तमा बाळगू नका, असे नव्या उमेदीच्या लेखकांना त्याने परत परत बजावले आहे. एक वाचक सोडले तर जन्मात त्याने कुणाचाही मुलाहिजा ठेवला नाही. भारतीय संस्कृतीबद्दल आकर्षण वाटून तो इथे आला होता. तो दक्षिणेत जाऊन रमणमहर्षींना भेटला. त्या भेटीचा रोमहर्षक वृत्तांत त्याने विनम्रभावाने लिहून ठेवला आहे. त्या वृत्तांताचेही मराठी भाषांतर उपलब्ध आहे. त्याने लेखणीवर ऐश्वर्य भोगले. लूट करणाऱ्या मोगलांसारखा पैसा मिळवला. नाटकांनी त्याला अव्वाच्या सव्वा हात दिला. त्याला मुलगा नव्हता. आपल्या धनाचा विश्वस्त निधी उभारून त्यातून मिळणाऱ्या व्याजावर उमेदवार लेखकांना नवे अनुभव मिळविण्यासाठी विश्वपर्यटन करण्याची संधी मिळावी, अशी बहुमोल व्यवस्था त्याने कनवाळूपणे केली. ह्याच शिष्यवृत्तीचा फायदा घेऊन वेस्ट इंडियन कादंबरीकार व्ही. एस. नायपॉल इकडे येऊन लाथा झाडून गेला.

मॉम तोतरा होता. त्यामुळे त्याच्यात सुप्त आणि खोल असा न्यूनगंड निर्माण झाला. टिचभर वाटणाऱ्या ह्या किरकोळ शारीरिक दोषातून त्याच्या व्यक्तिमत्वात प्रचंड दोष निर्माण झाले. तोतरेपणामुळे तो चारचौघात मिसळायचा बंद झाला. वैद्यकीय व्यवसायाचे त्याने जर्मनीत जाऊन अद्यावत उच्च शिक्षण घेतले, पण लोकांच्या भीतीने त्याने कधी कानाला स्टेथोस्कोप म्हणून कसा तो लावला नाही!

जिभेचा संबंध येणार नाही असं लेखणीचं क्षेत्र त्याने निवडलं. सुरुवातीला सपाटून मार खाल्ला. पण नागासारखा आपला फणा त्याने सदोदीत ताठ ठेवला योग जमून आले आणि लेखक म्हणून त्याच्या नावाचा बोलबाला होऊ लागला. आपल्या तोतरेपणाला स्त्रीवर्गात संभाळून घेतलं जाणार नाही, ह्या भीतीने त्याने लग्न टाळलं आणि विकृत वासनाशमनात आनंद मानला. जेराल्ड हॅक्सटन् ह्या मद्यपी पण देखण्या अमेरिकन सैनिकाची आणि त्याची दोस्ती इतकी घनिष्ट झाली की अखेरीस त्या अतिरेकाचा परिणाम समाजात मॉमची बेअब्रू होण्यात झाला. पण चटक अब्रूवर मात करते! वाईट वर्तणुकीला पात्र झाल्यामुळे हॅक्सटनला इंग्लंड-मधून कायद्याने हद्दपार करण्यात आलं. त्याच्यामागोमाग मॉमनेही कायदेशीर गंडांतर आलेलं नसतानाही इंग्लंडला राम राम ठोकून दक्षिण फ्रान्समध्ये टोलेजंग प्रासाद बांधला. हॅक्सटन तिथे मॉमचा कंपॅनियन म्हणून वीस वर्षं राहीला. दर-म्यानच्या काळात, आपण चारचौघांसारखेच धट्टेकट्टे, निरोगी मनाचे मर्द आहोत हे जगाला दाखवून देण्याची मॉमला खुमखुमी आली. काळजात घर करून बसलेल्या न्यूनगंडातूनच हा उठाव झाला. एका मेजवानीच्या प्रसंगी मिसेस सायरी नावाच्या विवाहीत अमेरिकन बाईबरोबर त्याची ओळख झाली. मॉमच्या लेखनावर ती लुब्ध होतीच. ह्या ओळखीमुळे ती फुलून आली. चार वर्षं मॉमने तिच्याबरोबर चोरटे चाळे केले. नंतर तिने नवऱ्यापासून घटस्फोट मिळविल्यावर तिचा छुपा प्रियकर असलेल्या मॉमने तिच्याशी लग्न केलं. पण मर्दाच्या जीवनाची मॉमला सुतराम गोडी नव्हती. ते सोंग त्याच्याने पेललं नाही. त्याच्यावर भाळलेल्या कलावंत मनाच्या सायरीला टाळून तो हॅक्सटनबरोबर सातासमुद्रावर सफरी करण्यात आपलं आयुष्य घालवू लागला. सायरीने शांतपणे घटस्फोट घेतला. तिने गृहसजावटीच्या पेशाला वाहून घेतलं. त्या क्षेत्रात तिने भरपूर नावलौकीक आणि संपत्ती मिळवली. त्यामुळे मॉमच्या न्यूनगंडात भर पडली. त्याने वृत्तपत्रात स्वतःच्या सहीने आत्मचरित्रविषयक मजकूर लिहून जाहीर केलं, 'सायरी लबाड होती. आपल्या दुसऱ्याच एका प्रियकराकडून दिवस गेलेले असताना, ते पाप लपवून ठेऊन ह्या बयेने केवळ पैशाच्या आशेने मला लग्नाच्या बधनात अडकवलं.' ही वकिली लोकांना पटली नाही. यशस्वी झालेल्या सायरीवर नाराज झालेला मॉम पुन्हा हॅक्सटनकडे आकृष्ट झाला. पुढे हॅक्सटनला क्षयाची बाधा झाली. त्यातच त्याचा रक्त ओकत ओकत अंत झाला. दुःख विसरण्यासाठी एकाकी झालेला मॉम अमे-रिकेत राहू लागला. सायरीपासून त्याला एक मुलगी झाली, जिचं पितृत्व त्याने तत्वतः नाकारलं, पण व्यवहारतः पाळलं. आपण जमविलेली थोर चित्रकारांची किमती चित्रं ती पळवते, विकते आणि पैशांची परस्पर विल्हेवाट लावते, असे तिच्यावर आरोप करून त्याने तिच्यावर दिवाणी दावे लावले! पुन्हा ह्या सर्व उपद्व्यापांचा परिणाम मॉमची सद्गृहस्थ म्हणून पत संपुष्टात येण्यातच झाला.

मॉमला पुन्हा एकदा न्यूनगंडाने घेरलं. तो अक्षरशः ढसा ढसा रडला.

' न्यूनगंडानेच आपण आपलं मरण ओढवून घेतलं आहे हे मॉमच्या नंतर—नंतर लक्षात आलं. ज्या विकृतीचे आपण बळी ठरलो, त्या विकृतीने नव्या उमेदीच्या तरुण लेखकांचा ग्रास घेऊ नये म्हणून हृदय हळुवार करून तो लक्ष ठेवू लागला. नव्या लेखकांना मेजवान्या देणं, उपदेश करणं, धोक्याचा कंदील दाखवणं आणि प्रवासाला पैसे देणं, हा जणू त्याचा छंदच झाला. ह्या हळूवारपणाचं उगमस्थानसुद्धा खूप खोलवर रूजलेला न्यूनगंड हेच होतं. ह्या न्युनगंडातूनच त्याने आपल्या डोक्यावर संपत्तीचा मांडव घालून घेतला. चहूबाजूला प्रतिष्ठेच्या पक्क्या भिंती उभ्या करण्याचा यत्न केला. पण फुटलेलं भींग सांधलं नाही. लेखक म्हणून त्याने अत्युच्च यत्ता गाठली. रशियात आणि जपानमध्ये त्याच्या साहित्यकृतींची किंमतही कल्पनातीत वधारली. पण कुठे तरी भांडं गळकं राहीलं हेच खरं ! परत परत तो अंतःकरणपूर्वक सांगू लागला, ' मंडळी, माझं सारंच चुकलं; माझं सर्व आयुष्य फुकट गेलं. कशाला जन्म घेतला मी ? काय साधलं ? मला मरण हवंय मरण ! आणि इच्छा एकच आहे की ह्या पृथ्वीतलावर कधीतरी असा उदारमनस्क समाज नांदो की, जो आपल्या कलावंतांच्या कमकुवतपणाकडे आणि जन्मजात दोषांकडे संपूर्ण दुर्लक्ष करेल; नव्हे, की जो कलावंताला त्याच्या रक्तातून आलेल्या दोषांसकट जवळ करील !'

हे झालं खाजगी जीवनातल्या विकृत वृत्तीच्या मॉमबद्दल. लेखक म्हणून त्याची प्रतिमा सदैव तेजस्वी राहिली. मॉमला आपल्या वाङ्मयीन यशाची बाधा झाली नाही. त्याने स्वतःच्या लेखनाविषयी लिहिलं, ' माझ्यापाशी जन्मजात गुण फार कमी आहेत. मात्र मला माझ्या व्यक्तिमत्त्वाचं असं एक जागृत भान आहे. त्याच्या जोरावर माझ्या अल्पस्वल्प गुणांची मी वाढ करू शकलो. माझ्याकडे ईश्वरदत्त असं शहाणपण आहे. लोक आंधळे असतात. त्यांना समोरच्या सत्याचं नीट आकलनच होत नाही. मला सत्य नेमकं आणि नग्नावस्थेत दिसतं. प्रतिभाशाली लेखक दगडविटांच्या भिंतीपलीकडचंही पाहू शकतात. माझी मात्र नजर तेवढी भेदक नाही. अश्रद्ध म्हणून माझी ख्याती आहे. मी फक्त सत्य तेच सांगितलं. मी मुळात आहे, त्यापेक्षा वेगळं असं माझं चित्र लोकांना दिसता कामा नये. ह्याच न्यायाने मी दुसऱ्यांचे मुखवटेही सहन करणार नाही.' सिरील कॉनॉलीने मॉमविषयी कृतज्ञतापूर्वक लिहिलं आहे की, ' मॉम हा अजब जादूगार होता. साहित्यिकाची जिंदगी जगण्यातच खरी कृतार्थता आहे हे त्याच्या संगतीत असताना उमेदवार लेखकांना सतत जाणवत राहायचं.'

पंच्याहत्तराव्या वर्षी त्याने आपखुषीने आपला लेखनयज्ञ थंड केला. लेखणीला विराम देताना त्याने लिहिलं, ' रामराम ! जीवनाच्या धकाधकीतून मी वृद्धत्वामुळे निवृत्त होत आहे. माझ्या सर्व कामना शांत झाल्या आहेत. आता कशाचीच भूक

उरलेली नाही. इतःपर माझी कुणाशीही, कसलीही स्पर्धा नाही. मला जे काही सांगायचं होतं ते माझं सांगून झालेलं आहे. आता माझी जागा मी दुसऱ्यांना देतो. आता त्यांना त्यांचं म्हणणं मांडू दे. मी खूप भोगलं. यापुढे समंजस निवृत्ती हेच माझं भूषण. काही ना काही करून लोकांसमोर नाचलं नाही, तर जनता तुम्हाला विसरते हा सिद्धांतच आहे. पण रसिक वाचकांच्या विस्मृतीचं आता मला सोयर-सुतक उरलेलं नाही. मी मेल्यानंतर लोक म्हणतील, 'अरेच्च्या! हा अजून जिवंत होता? आम्हाला वाटलं हा केव्हाच मेला म्हणून!' अनंतात विलीन झालेल्या माझ्या कानांवर हा शेरा पडला की मी फक्त गालातल्या गालात हसेन! मंडळी, रामराम! आणखी सांगतो, देव आहे की नाही ते मला माहीत नाही. त्याच्या अस्तित्वाबद्दल खात्रीलायक असे पुरावे मला सापडले नाहीत. मानवी मनात वसत असलेल्या भीतीच्या भावनेतून ईश्वर ह्या कल्पनेचा जन्म झाला असावा. मला भीती कधी वाटली नाही. साहजिकच देवबिव माझ्या बाबतीत उद्भवलेच नाहीत. देव जर सकलांचा कल्याणकारी आहे असं म्हणतात तर जगात इतकं दुःख–दैन्य का नांदतं? देव त्या दुःख–क्लेशांचं समूळ उच्चाटन का करीत नाही? हिंदु दर्शनात सांगितलेल्या चिदानंदस्वरुपी अनाद्यनंत आत्म्याच्या अस्तित्वाविषयी मला काही काळ फार ममत्व वाटलं होतं. कुठल्याही देवविषयक कल्पनेपेक्षा आत्म्याच्या चिर-प्रवासाची ही कल्पना निःसंशयपणे श्रेष्ठ आहे. पण आज मला ती एक निव्वळ कविकल्पनाच वाटते. विश्वाचा आणि विश्वाच्यापलीकडल्या अनंताचा पसारा पाहून माझी मती इतकी गुंग होऊन जाते की, तिच्या निर्मात्याचा मला पूर्णपणे विसरच पडतो! आता मला कशातही रस वाटेनासा झाला आहे. मी पुस्तकं वाचीत नाही की नवे मित्र जोडीत नाही. कारण ताटातुटीशिवाय त्यातून काय बरं निर्माण होणार आहे? मी माझे पंख पसरले आहेत.'

हे शहाणपणाचे बोल लिहिल्यानंतरचं न संपणाऱ्या सतरा वर्षांचं जराजर्जर जीवन म्हणजे मॉमने भोगलेला एक प्रदीर्घ आणि असह्य असा शापच होता! जन्म-भर तो तसा एकाकीच होता. आता तो जोडीस विकलांगही झाला. प्रथम त्याच्या कानांनी त्याला दगा दिला. तो ठार बहिरा झाला. मग स्मृती त्याला दगा देऊ लागली. हातपाय थरथरू लागले. ह्या अवस्थेत तो कॅप फरॅट ह्या दक्षिण फ्रान्स-मधल्या हवेच्या गावी दिवस ढकलत राहिला. दिवसभर रहस्यकथांची पुस्तकं वाचणं आणि मद्याचे प्याले रिकामे करण एवढंच जणू अवतारकृत्य उरलं. तशात, आपल्याला पुनरपि तारुण्योन्माद प्राप्त व्हावा ह्या वेडाने त्याचा पुरता कबजा घेतला. पंच्याहत्तरी ओलांडल्यावर त्याने इंद्रीय जोमदार करण्यासाठी खास दवा-पाणी घेतलं. पण तोही प्रयत्न फसला. त्याचा न्यूनगड किती जबरदस्त होता ह्याचीच ही केविलवाणी निशाणी होती. मॉमचा लेखक असलेला पुतण्या रॉबीन

पृष्ठ ५३ वर

# काचेच्या घरात राहून, धोंडे मारणे !

नलिनी अंबाडे

अमेरिकन चंद्रावर जाऊन, मोटारगाडीतून फिरून आले. रशियानेही माणूस पाठविला. दोन्ही देशांच्या रॉकेटस्‌बद्दल झाडून साऱ्या वर्तमानपत्रांनी रकाने भरले. अमदी पहिल्या पानावर ठळक बातमी अमेरिकन रॉकेटस्‌ची. पण भारतात आम्हीदेखील रॉकेटस् तयार करतो आणि आमचीही रॉकेटस् आकाशात ऊंच जातात हे किती लोकांना ठाऊक आहे ?

भारतातून रॉकेटस् आकाशात सोडण्याचा पहिला मान कुणी मिळवलाय ? त्रिवेंद्रमने. कन्याकुमारीजवळ ५४ मैलांवर असणारी केरळ प्रांताची ही राजधानी. इंडियन नॅशनल कमिटी फॉर स्पेस रिसर्चने सुचविल्यावरून भारताच्या अॅटॉमिक एनर्जी खात्यातर्फे हे चालविले जाते. केंद्राचे नाव आहे–' थुंबा इक्वेटोरियल रॉकेट लाँचीग स्टेशन '–थुंबा त्रिवेंद्रमजवळ आहे. युनोच्या विसाव्या अधिवेशनात याला १९६५ पासून मान्यताही मिळालीय, अर्थातच उभारणीपासून आत्तापर्यंत, फ्रान्स, रशिया व अमेरिका तिघांचेही संपूर्ण सहकार्य त्याला लाभले आहे. जवळ जवळ तीन हजार माणसे तेथे काम करतात.

रॉकेट शब्दावरून, चंद्रावर जाणारी, अकरा मजली, कित्येक टनांची प्रचंड रॉकेटस् असा वाचकांचा कृपया गैरसमज नसावा. दिवाळीत लहान पोरंटोरं उडवतात, ती चार चार आण्यांची रॉकेटस्, थुंबा रॉकेटस् आणि हाउस्टन तळावरून जाणारी अमेरिकन रॉकेटस् यांत साम्य आहे फक्त शब्दाचे. थुंबा येथील रॉकेट हे अगदीच किरकोळ आकाराचे असून, केवळ हवामानाचे रिपोर्टस् घेण्याकरिता त्यांचा उपयोग होतो. पूर्वीच्या काळी हवामानाचा अंदाज घेण्याकरिता मोठे मोठे फुगे आकाशात सोडीत असत. वायरलेस–रेडियोचा शोध लागल्यानंतर त्या फुग्याखाली ठेवलेल्या पेटीत बॅटरीवर चालणारा छोटा ट्रान्समिटर असे–तो पृथ्वीवर संदेश पाठवी. जेमतेम २–३ मैल उंच तो फुगा वातावरणात जाई व नंतर कुठेतरी पडून जाई. थुंबा रॉकेट ही याच प्रकारातील, पण पुष्कळच सुधारलेली आवृत्ती होय.

थुंबा येथील रॉकेटस् अर्थातच पृथ्वीपासून १०० मैलांवरील वातावरणातील हवामानाबद्दल उपयुक्त ठरलेली आहेत. सध्या त्यामध्ये सोडीयमची वाफ (सोडीयम

व्हेपर पे लोड) वापरली जाते, त्रिवेंद्रम गाव दक्षिणेतील सर्वात शेवटचे मोठे गाव शिवाय हिंदीमहासागर, अरबी समुद्र व बंगालचा उपसागर ह्या तिन्ही समुद्रांचे तिठ्ठ्यावर जवळ जवळच आहे. त्यामुळे सागराच्या हवामानाची बातमी मिळते— मुख्यत: प्रचंड हिंदी महासागरावरील ! १९६३ पासून १९६८ पर्यंत जवळ जवळ ४२ ते ४५ रॉकेटस् सोडण्यात आली. केंद्र जरी केरळ राज्यात असले तरी बांधणी-पासून ते सध्याचा दरमहाचा पगारापर्यंत खर्च मध्यवर्ती सरकारचा आहे. हवामाना-बरोबरच, आकाशातून ज्या असंख्य उल्का कोसळतात त्यांच्या पृथक्करणाचाही अभ्यास येथे होतो. रात्री आकाशातून तारा निखळलेला आपण पाहातो. पृथ्वीवर येईपर्यंत बहुतेक त्याची राखच होते व कुठेतरी शेतात, पाण्यात विरून जाते. पण त्यांच्यात काय काय खनिजे आहेत यांचाही अभ्यास आहेच. इंग्लिशमध्ये तर METEOROLOGY नावाचे नवीन शास्त्रच निर्माण होऊन, पुष्कळच प्रगत झालेले आहे, भारतातील हा प्रयत्न म्हणूनच स्तुत्य आहे.

असे हे केंद्र इतकी वर्षे नीटपणे चाललेच कसे हा एक प्रश्नच आहे ! त्यावर स्वतंत्र संशोधन करायला हवे. कारण ‘लेबर ट्रबल्स’ नामक एक टीबी (क्षय) सारखा रोग केरळातील उद्योगांस लागलेला आहे ! क्षयी मनुष्य चालता फिरता असतो—पण निस्तेज, सदैव खोक खोक खोकणारा, सदा आजारी अन् ‘चलती फिरती लाश’ छापाचा ! केरळातील उद्योगांची स्थिती थोडीफार अशीच झालीय, त्याला कारणे अनेक. ‘लेबर ट्रबल्स’ म्हणजे नेमके काय, त्या कुठे सुरू होतात अन् कधी संपतात हे मलाही सांगता येत नाही. क्षयी मनुष्य जोवर अंथरुणावर पडत नाही तोवर त्याला टीबी झालाय हे सर्वसाधारण माणसाला सहज समजून येणे कठीण जाते, तसेच कोणताही कारखाना प्रत्यक्ष संप, घेरावो होऊन बंद पडतो, याचा अर्थ ट्रबल्स तिसऱ्या स्टेजला पोचल्यात—पेशंट अंथरुणावर पडला.

भारतातील सर्वांत अधिक साक्षरतेचे प्रमाण केरळाचे. १९६५ मध्ये केरळातील साक्षरता ४७% होती. तर आज ७०% आहे अर्थात् मिशनऱ्यांनी जरी शिक्षणाचा प्रसार वरून वरून केला—प्रत्येक चर्चमधून शाळा चालविल्या—तरी धर्मप्रसारही केला नाही असेही नाही. आज केरळातील प्रत्येक खेड्यांत किमान दोनतरी चर्चेस दिसतीलच, हिंदू देवालय, मशीद नसेलही काही गावातून. केरळातील कॅथॉलिक पार्टी तर तेथील राजकारणातही जागा लढवून, त्या सर्वच्या सर्व जिंकते. अर्थात् साक्षरता अधिक हे लेबर ट्रबल्सचे मूळ नाहीय, पण एक कारण खास आहे. कमालीचे दारिद्र्य आणि चिक्कार चिल्लीपिल्ली ही मुख्य कारणे लेबर ट्रबल्सच्या मुळाशी आहेत. एकेका झोपडीत किमान सहा—सात पोरं—सगळी उघडीवाघडी ! कारण ‘आकाशातल्या बापा’ला कुटुंबनियोजन मान्य नाही ! तुम्ही साऊथ इंडियाच्या टूरवर आलात तर दिसेलच. कन्याकुमारी ते त्रिवेंद्रम अंतर जेमतेम ५४ मैलांचे आहे. पण या ५४ मैलांच्या बसप्रवासात एक गाव संपले कधी अन्

दुसरे लागले कधी तेच समजेना. अडीच तासांचा प्रवास जणू सिटी बसमधूनच झाला. हडपसरपासून खडकीला जावं तसा. गावाच्या नावाच्या पाटचा फक्त बदलत–रस्ते माणसांनी (त्यात स्त्रिया व मुले अधिक) फुललेले. ५४ मैलावर दुतर्फा झोपड्या–झोपडीवजा दुकाने! साहजिकच केरळी मुलामुलींना समजायला लागण्यापूर्वीच देश सोडावा लागतो. आज भारतातील कोणत्याही कानाकोपऱ्यांत–हिमालयाच्या थंडीत–नागालॅण्डच्या जंगलात–कच्छच्या वाळवंटात केरळीय मंडळी स्थाईक झालीत. याचं कारण इथे लपलेलं आहे. महाराष्ट्रीय कारकुनाची जर परभणी, खानदेश किंवा यवतमाळ भागात बदली झाली तर तो सरळ राजीनामा देतो–अगदी पुरुषासारखा पुरुष असून! आणि कुणी मेरीकुटी, अन्नम्मा केरळातून एकटी पठाणकोटला जाऊन, एकटीच नौकरी करते! सहाजिकच देशभर पसरलेल्या या विचाऱ्यांना मायभूमीकडे जावेसे वाटणारच, तर केरळात उद्योगांचीच बोंब!

थुंबा रॉकेट केंद्रात असेच काहीसे झाले. सेंट्रलगव्हर्नमेंट अुद्योग – म्हणजे चांगला पगार व पर्मनंट नोकरी. प्रत्येक जागेवर हजारो अर्जदारांची झुंबड! आता प्रत्यक्ष जागेवर केरळीयासच नोकरीस लावणे कसे शक्य आहे? भारतीय सर्व प्रांतामधून अर्ज येणार. अुच्च शिक्षणाच्या टेक्निकल जागांसाठी लायक स्थानिक मंडळी मिळतीलच असे नाही. साहजिकच इतर प्रांतीयही थोडे थोडे तेथे आले. आता इतर प्रांतियात मराठी, हिंदी, मंडळी असतील असा गैरसमज करून घेवू नका. गावात पिढ्यान्पिढ्या किराणा दुकान चालविणारा मारवाडी आपण मारवाड्याच समजतो ना. तशाच प्रकारे तिकडेच राहिलेले तमोळीयन्स, तेलगू, कन्नड असेच शेजारच्या प्रांतातील लोक गेले असतील – आणि 'ते अुपरे हाकून लावा' अशी 'सेना' टाईप भाषा सुरू झाली. वास्तविक आज पटावर असणाऱ्या २४८९ मंडळी-पैकी, १८५२ जण केरळीय आहेत – म्हणजे हे प्रमाण ७५% पडते. बाकीच्या ६३७ पैकी बहुतेक शेजारीप्रांतीय अन् हाताच्या बोटावरती मोजावे इतके टेक्निकल लोक बंगाली, हिंदी, पंजाबी वगैरे वगैरे! राष्ट्रीय एकात्मतेची भावना गुंडाळून ठेवून – अगदी सर्वोच्च सुशिक्षित लोकांनी – चळवळ चालू केली. २ जुलैला चळवळीचा स्फोट झाला व १५ ला केंद्र बंद पडले! पुढे लौकरच ते केंद्राचे डायरेक्टरांचे समझोत्याने चालू झाले म्हणा. ते म्हणाले की कामगारांचे म्हणजे टर्नर, फिटर, मेकॅनिकांचे भरतीत सध्याच ९० ते ९५ टक्के स्थानीय मंडळी आहेत, तर कारकुन व त्यांच्याइतकाच पगार असणाऱ्यात ८५% पेक्षा अधिक लोक स्थानिक आहेत. पण स्थानिक लोकांना अगदी सेंटपर्सेंट १००% भरती फक्त केरळीयांची हवी आहे. अर्थात् शेवटी आपण सर्व भारतीयच ना? प्रकल्प जो आहे तो भारताच्याच हिताचा ना? मग अशी 'कुपमंडूकता' कशाला?

अर्थातच स्थानिक वृत्तपत्रांतून – वाचकांच्या पत्रव्यवहारातून – ह्या चळवळीचा निषेध करण्यात आला हे उत्तमच. 'हिंदू' ह्या उच्चअभिरूचीच्या दैनिकात बंग-

लोरचा एकजण म्हणतो, ' प्रत्येक प्रांतात केरळीय आहेत. त्या त्या प्रांतांनीही जर ह्या केरळचाच कित्ता गिरवला तर तो केरळलाच फार महागात पडेल. परिणामी भारतीय उद्योगधंदे, प्रकल्प, कारखाने धोक्यात येतील.' या प्रसंगी मला आय. एस. जोहर यांच्या एका ' सवालास-जबाब'ची आठवण झाली. ' फिल्मफेअर ' मध्ये ते वाचकांच्या प्रश्नाना विनोदी, अर्थपूर्ण, मार्मिक अुत्तरे देतात हे सर्वांनाच ठाऊक आहे. कुणीतरी प्रश्न विचारला – म्हणजे छापला – की मल्याळी लोक प्रत्येक ठिकाणी आहेत. असे एकतरी ठिकाण सांगा की जेथे ते नाहीत. जोहरने फक्त एकाच शब्दाचे उत्तर दिले. ठाऊक आहे काय ? – ' केरळ '


## मुसाफिर

- एस. टी., रेल्वे, एअर लाइन्स तिकिटांची रिझर्वेशन्स मिळवून देऊ.
- सिनेमागृहे व नाटयगृहे ह्यांची तिकिटे मिळवून देऊ.
- धार्मिक-क्षेत्रे व प्रेक्षणीय पर्यटनस्थळे ह्यांच्या प्रासंगिक सहली आयोजित करतो.
- शाळा-कॉलेज, महिला मंडळे, क्लब्स यासाठी संपूर्ण सहली आयोजित केल्या जातील.
- महाबळेश्वर-माथेरान येथील हॉटेल बुकिंग, तसेच स्वतंत्र बंगले वा खोल्या भाडयाने मिळविण्यासाठी व्यवस्था केली जाते.
- मुंबईत अथवा परगावी जाण्यासाठी आलिशान ॲम्बेसेडर गाडया भाडयाने देऊ.
- आर. टी. ओ टॅक्स, टेलिफोन व इलेक्ट्रिक बिले भरणे व तत्संबंधी कामे केली जातात.

वरील उपलब्ध सेवांसाठी अथवा अधिक माहितीसाठी संपर्क सांधा –

**मुसाफिर**

गणेश निवास, गणेश पेठ लेन, खांडके बिल्डींग नं. ९ समोर प्लाझा सिनेमा नजिक, दादर, मुंबई २८.
टेलिफोन नंबर ४५८४६७

कार्यालयाची वेळ – सायंकाळी ५ ते ८ फक्त.

सौ. तारा पंडित

# हे कलकत्ता

## नक्षलवाद्यांशी बोलणी ?

नक्षलवाद्यांशी प्रत्यक्ष बोलणी करावीत काय ?...प्रश्न निर्माण झाला. या बाबतीत श्री. पंत लोकसभेत म्हणाले– पश्चिम बंगालमध्ये हिंसक कृत्ये आटोक्यात आणण्याचे काम बऱ्याच अंशी यशस्वी होऊ पाहात आहे. नक्षलवाद्यांशी तशी बोलणी तर नेहमीचीच सुरू आहेत; फार काय, आज सभेत पुढे येणारे प्रश्न हे देखील त्याच बोलण्याचा एक भाग आहे असेही त्यांनी विधान केले.

पश्चिम बंगालमधील हिंसक कृत्यांना एकदम आळा घालण्यासाठी म्हणून सर्वपक्षीय परिषद घेण्यात येत आहे, व एकूण २८ पक्ष ह्या परिषदेत भाग घेणार आहेत. श्री. सिद्धार्थ शंकर रे हे परिषदेचे उद्‌घाटन करणार आहेत. पण ह्या परिषदेत नक्षलवाद्यांचा CPI (M–L) हा पक्ष समाविष्ट नाही. तो वगळणे म्हणजे हॅम्लेटच्या नाटकातून डेनमार्कच्या राजपुत्राचे पात्र वगळण्यासारखे आहे. नक्षलवादी हिंसक कृत्ये करीत असतील, पण म्हणून सगळीच हिंसक कृत्ये त्यांच्याकडूनच होतात हे म्हणणे बरोबर नाही. श्री. रे यांनी ह्या पक्षाला निमंत्रण का केले नाही याची कारणे शोधीत बसण्याची गरज नाही. हा भूमीगत पक्ष आहे, जरी त्यांची एक दोन वर्तमानपत्रे नियमित प्रसिद्ध होत असली तरी ! मग ह्या पक्षाचे प्रतिनिधित्व करणार तरी कोण ? सरकारला बोलणी करायचीच झाली तर ज्यांना पकडून आणले व कैदेत ठेवले आहे अशांबरोबरच करावी लागतील अन् तशी बोलणी तर काही ठिकाणी अगोदरच सुरू झाली आहेत असं म्हणतात.

खरं म्हणजे प्रजासत्ताक राज्यात गनिमी मार्गाचा अवलंब करणं इष्ट नव्हे, जरी आपल्याला आमूलाग्र बदल घडवून आणायचा असेल तरीदेखील ! त्यासाठी शांततेच्या मार्गानेच पावले टाकणे आवश्यक आहे. पश्चिम बंगालच्या तरुणांनी हिंसेचा अवलंब करावा ही फारच खेदाची गोष्ट होय. म्हणूनच ह्या तरुणांना हिंसेपासून परावृत्त करण्यासाठी सतत प्रयत्न करायला हवेत. त्यासाठी त्यांच्याशी बोलणी करणे व त्यायोगे त्यांच्या प्रचलित कृत्यांचे दुष्परिणाम त्यांना समजावून देणे हे अपरिहार्य ठरते.

## बांगला देशचे कलाकार

धरमतल्ला विभागातील एका कोंदट नि घाणेरड्या घरात एका फाटक्या

सतरंजीवर बसून नाटकाची तालीम करीत असलेले हे तरुण स्त्री-पुरुष आहेत. कोण हे सारेजण ?

ह्यांच्यापैकी कुणी गायक आहेत तर कुणी नट...सगळे बांगला देशातून आलेले कित्येकजण तर एकमेकांना त्यांच्या देशात असेपर्यंत कधी भेटलेलेच नव्हते—! पण आता आपलं सर्व काही सोडून इकडे आल्यानंतर मात्र ते एकत्र आले आहेत; येथील अनोख्या वातावरणात पराकाष्ठेचा प्रयत्न करून कसेबसे पोटापुरते मिळवण्याची धडपड करीत आहेत

त्यांच्यापैकी अनेकांनी आपापल्या क्षेत्रात खूप नाव कमावले आहे. झहीर राल्हान बांगला देशचे एक चित्रपट दिग्दर्शक व निर्माते म्हणून प्रसिद्ध आहेत. अब्दुल जाबरखान ह्यांनी पूर्व बंगालचा पहिला चित्रपट तयार केला होता आणि हसन इमाम हे 'विक्षुब्ध शिल्पी (artist) समाजा'चे अधिपति आहेत. ह्या समाजानेच पश्चिम पाकिस्तानच्या एकसत्ताक राज्यपद्धतीविरुद्ध पूर्व बंगालच्या कलाकारांना एकत्र आणून चळवळ सुरू केली. त्यापैकी प्रसिद्ध सिनेतारका सुमित्रा देवी आणि चित्रकार मुस्तफा मन्वर हे प्रमुख होत.

श्री. राल्हान यांची मुलाखत घेतली असताना त्यांनी सांगितले की याह्याखानांच्या सैनिकांचा चित्रपटसृष्टितील लोकांवर विशेष रोष होता, कारण हे स्वातंत्र्ययुद्ध सुरू होण्याच्या पुष्कळच अगोदर जनतेच्या आशाआकांक्षा फिल्ममध्ये चित्रित केल्या होत्या, टेलिव्हिजनवर प्रदर्शित केल्या होत्या आणि विक्षुब्ध शिल्पी समाजाने आयोजित केलेल्या संगीत कार्यक्रमांतही व्यक्त केल्या होत्या.

स्वातंत्र्याच्या घोषणा प्रथम रूपेरी पडद्यावरच झळकल्या होत्या, आणि १९६९ मध्ये निर्माण झालेल्या 'जीबन थेके नेया' ह्या चित्रपटात त्या समाविष्ट केल्या होत्या. परिणामत: त्या चित्रपटावर पश्चिम पाकिस्तानकडून निर्बंध घालण्यात आला व पुढे १९७० च्या एप्रिलमध्ये पुन्हा तो मुक्त करण्यात आला, कारण त्याविरुद्ध खूप मोठी चळवळ झाली होती. फिल्म पाहून झाल्यावर लोकांनी लागलीच 'जय स्वाधीन बांगला' अशा घोषणा देत मिरवणूका काढण्यास सुरुवात केली.

ती विशिष्ट फिल्म अवामी लीगच्या एका नेत्याने भारतात आणली व ती पडद्यावर दाखविण्याविषयी भारत सरकारला विनंती करण्यात आली. पण ती दाखवण्यात काही तांत्रिक अडचणी आहेत असे उत्तर मिळाले.

## ही दुर्दशा !

पश्चिम बंगालमधील लोकांना वाईट गोष्टींचा बराच सराव झाला आहे. शैक्षणिक क्षेत्रातदेखील अवास्तव घटनांचे स्तोम माजू लागले आहे. रविंद्र भारती विद्यापीठाच्या पदवीदान समारंभाच्यावेळी घडलेल्या घटनेने तर हे सिद्धच करून

दाखवले आहे. त्यावेळी विद्यार्थ्यांनी अगोदरच योजना आखली होती. आपल्या मागण्या पुरवल्या जाव्यात म्हणून ऐन समारंभाचेवेळी त्यांनी राजकीय घोषणा करण्यास सुरुवात केली. हे त्यांचे वागणे पदवीदान समारंभाच्या कार्यक्रमाचेवेळी अगदीच न शोभणारे असे होते. आपणाला काय हवे आहे त्यासाठी आरडाओरडा करणे व काय नको असेल ते लाथाडणे या दोन्ही प्रयत्नांमुळे शिक्षणसंस्था सुरळीत चालण्यात अडथळे निर्माण होतात. त्याबाबत विद्यार्थ्यांना कितीही डोकेफोड करून समजावून दिले तरी ते पालथ्या घागरीवर पाणी ठरते !

दोन विद्यार्थ्यांनी आपल्या डिप्लोमा सर्टिफिकेटाचे कागद सर्वांसमक्ष फाडून टाकले, कारण त्यांचे म्हणणे नोकरीच्या बाजारात या कागदांना काहीही किंमत नाही. हे कारण बहुतांशी खरे असले तरी ते कृत्य शहाणपणाचे नव्हते, खास !

शिक्षणानंतर नोकरी मिळेलच अशी आश्वासने विद्यापीठांनी द्यावी ही अपेक्षाच नाही आणि नोकरीची संधी उपलब्ध करून देण्याचे सामर्थ्यही विद्यापीठामध्ये नाही. विद्यापीठे फक्त विद्यार्थ्यांची काही अंशी इतपत तयारी करून देतात जेणे करून वेगवेगळ्या प्रकारच्या कामासाठी ते लायक ठरावेत. पदवीदान समारंभाचेवेळी प्रोफेसर एस्. एन्. बॅनर्जी ह्यांनी आपल्या भाषणात आवर्जून सांगितले की 'शिक्षण-पद्धती आता बदलली पाहिजे व अशाच पद्धतीचा अवलंब करायला हवा ज्यायोगे विद्यार्थ्यांच्या भावी जीवनात स्थैर्य निर्माण होण्यास मदत होईल...' पण प्रत्यक्षात एखादेवेळी अशीही परिस्थिती आढळते की नोकरी असते पण युनिव्हर्सिटीचे विद्यार्थीच तिच्या लायक नसतात. कारण त्यांचे ज्ञान अपुरे पडते. हेही विसरून चालणार नाही. सध्याच्या शिक्षणपद्धतीत बदल जरूर करावा पण सुशिक्षित बेकार निर्माण करण्यास ती कारणीभूत ठरली आहे हे म्हणणे म्हणजे 'वड्याचे तेल वांग्यावर...' यासारखेच होय !

## स. न. वि. वि.

---

प्रिय संपादक—ट्राम किंवा बसमध्ये ऐसपैस बसलेला माणूस व पाय ठेवायलाही पुरेशी जागा नसताना बाहेरून लटकलेला माणूस यांना समान भाडे आकारण्यात येऊ नये. कळावे, आपला...

□ □ □

विमानोड्डाण ही आज इतकी नित्याची गोष्ट होऊन बसली आहे तरीसुद्धा आमच्यातील तरुण वा तरुणी स्वत: विमानोड्डाण शिकायला क्वचितच तयार होतात. विमानोड्डाण ही एक अतिशय धोक्याची, अवघड आणि खर्चाची बाब आहे, अशी सर्वसामान्य गैरसमजूत आहे. ' वैतागलेल्या आणि बोअर ' झालेल्या तरुण पिढीला चेतना देण्यासाठी ४० वर्षापूर्वीच्या एका वैमानिकेची ही कहाणी !

# अमेलिया इअरहार्ट

डॉ. शरद अभ्यंकर

विमानविद्येच्या बालपणी स्त्री-वैमानिक ही एक दुर्मिळ चीज होती. यापैकी अमेलिया इअरहार्ट या वैमानिकेने १९२८ ते १९३७ या काळात साऱ्या जगात आपल्या साहसी उड्डाणांनी खळबळ उडवून दिली होती. उंच, शेलाटी, आणि प्रसन्न व्यक्तिमत्त्वाची अमेलिया आपले करडे डोळे, उस्कटलेले केस, अवखळ वृत्ती आणि दिलखुलास हास्य यामुळे सर्वांना मोहक वाटत असे.

विमानाचा आवाज येताच लोक घराबाहेर येऊन आकाशात बघू लागत. अशा त्या काळी ए. ई. ( ती स्वत:स ए. ई. म्हणे) मात्र एकाद्या तकलादू विमानातून उच्चांक निमार्ण करत आणि मोडत संचार करीत असे.

कॅन्सास राज्यातील अचिसन येथे १८९८ मध्ये अमेलियाचा जन्म झाला. वडिलांचे कामामुळे गावोगावच्या शाळा करीत ती शिकागो येथे मॅट्रिक झाली. त्यावेळी पहिले महायुद्ध चालू होते. युद्धकार्याला मदत म्हणून तिने परिचारिकेचे शिक्षण घेण्यास सुरुवात केली. त्यातून वैद्यक विषयाची आवड उत्पन्न झाल्यामुळे तिने वैद्यकीय महाविद्यालयात प्रवेश मिळवला. परंतु हे शिक्षण पूर्ण न करताच तिने असेच निरनिराळे अठ्ठावीस व्यवसाय केले. ती म्हणत असे, ' कुठल्याही कॉलेजच्या शिक्षणापेक्षा अशा तऱ्हेने प्रत्यक्ष आयुष्याचाच अनुभव घेणं केव्हाही चांगलं.

नवीन नवीन लोक भेटतात आणि अकल्पित अशा किती गोष्टींचा अनुभव येतो.'

असाच अकल्पित अनुभव कॅलिफोर्नियातील लाँग बीच येथे भरलेल्या हवाई जत्रेच्या वेळी तिला आला. अनेक धाडसी तरुण आपआपल्या विमानातून उड्डाणाची विविध प्रात्यक्षिके दाखवीत होते. वडलांच्यामागे तिने लगेच लकडा लावला— 'किती वेळ लागतो विमान शिकायला ? विचाराना त्यांना. आणि किती खर्च येतो तेपण !' वडलांनी चौकशी करून सांगितले, '५–१० तास लागतात विमान चालवायला शिकायला. आणि खर्च येतो एक हजार डॉलर्स. म्हणजे प्रश्नच मिटला. चला घरी.'

पण अमेलिया पुन्हा तळावर आली आणि एक फेरी विमानातून फिरून आली. विमानोड्डाणावर तिचं प्रथमदर्शनीच प्रेम बसलं. काय वाटेल ते करून ही कला हस्तगत करायचीच असा तिने निश्चय केला. कधी टेलिफोन ऑपरेटर तर कधी फोटोस्टुडिओत नोकऱ्या करून ती मिळतील तेवढे पैसे हवाई उड्डाण शिकण्याकरता खर्चू लागली. जमेल तिथे जमेल तितका विमानोड्डाणाचा अनुभव घेत अखेर तिने महिना ६० डॉलर्स पगारावर बोस्टन येथे शिक्षिकेचे काम पत्करले.

एके दिवशी वर्गात शिकवत असताच तिला फोन आला, 'प्रिय इरहार्ट, तुम्हाला अद्याप विमानोड्डाणात रस आहे काय ? तर मग मला भेटा.'

विमानातून अटलांटिक महासागर पार करण्याच्या मोहिमेत सहभागी होण्याचे आवाहन ए. ई. ला करण्यात आले होते. विल्मर ऊर्फ बिल् स्टुल्ट्झ हा वैमानिक आणि लू ऊर्फ स्लिम गॉर्डन हा खटपट्या (Mechanic) 'फ्रेंडशिप' विमानातून हा प्रवास करणार होते. हे विमान ७२ फूट पंखविस्तार असणारे आणि पाण्यावर उतरण्याकरता 'भोपळे' (Pontoons) बांधलेले होते. नुसती प्रवासी म्हणून का होईना या विमानातून जायला ए. ई. एका पायावर तयार होती. या मोहिमेचा खर्च एका श्रीमंत स्त्रीने केला होता आणि कोणीतरी स्त्री या विमानातून गेली पाहिजे अशी तिची अट होती.

१९२८ सालची विमानं सर्वस्वी हवामान आणि वाऱ्यावर विसबून असत. विरुद्ध दिशेने वाहाणाऱ्या वाऱ्याला तोंड देत दूर अंतर जाण्याइतके इंधन त्यात मावत नसे. हवाबंद आणि वातानुकूलित नसल्यामुळे उंच वादळवाऱ्याच्या कक्षेपलिकडे जाऊन उड्डाण करणे त्यांना जमत नसे. त्यामुळे बोस्टनहून निघालेले हे चिमणे विमान न्यू फाऊंडलंडच्या ट्रेपासी गावात येऊन वाईट हवेमुळे तेथेच अडकून पडले, ते पुरे १५ दिवस. अखेर ते जेव्हा निघाले तेव्हा त्यांना निरोप द्यायलाही कोणी नव्हतं. आणि जवळ जवळ २१ तासांनी ते साउथ वेल्सला पोचले तेव्हा त्यांचं स्वागत करायला कोणी नव्हतं.

या धाडसी मोहिमेतूनच अमेलियाची आणि मोहिमेचा एक प्रवर्तक जॉर्ज पुटनॅम यांची ओळख झाली, प्रेम जमलं आणि बऱ्याच आढेवेढ्यानंतर कु. इअरहार्ट सौ.

पुटनॅम बनल्या. मात्र एकमेकांच्या वैयक्तिक इच्छा आकांक्षांच्या संसाराआड येता कामा नये हे दोघांनीही मान्य केले. पुटनॅम पूर्वीप्रमाणेच ए. ई. च्या धाडसी मोहिमांना मदत करू लागले.

## पूर्वदिशेला झेप

१९३२ पर्यंत अमेलियाने एक हजार उड्डाण-तास पूर्ण केले होते. तिचे स्वत:चे लॉकहीड व्हेगा विमान होते. 'फ्रेंडशिप' विमानातून प्रवासी म्हणून केलेला अॅटलांटिक ओलांडण्याचा विक्रम तिने स्वत: एकटीने पार पाडायचे ठरवले. स्वत:च्या विमानाला तिने नवे 'वास्प' एंजिन आणि काही आधुनिक मापनयंत्रे बसवून घेतली. विमानात भरपूर पेट्रोल आणि तेल भरले. स्वत:करता मात्र तिने फक्त एक थर्मासभर सूप आणि टोमॅटो रसाचा एक डबा घेतला. अंगावरच्या कपड्यांनिशी २० मे १९३२ च्या संध्याकाळी अमेलियाने न्यू फाउंडलंडवरून पूर्वदिशेला झेप घेतली.

परंतू अमेलियाची ही सफर पूर्वीच्या सफरीइतकी 'निरस' होणार नव्हती थोड्याच वेळात ढगांनी चंद्र झाकून गेला. मेघगर्जना, विजेचा कडकडाट आणि तुफानी वारे यांमुळे अमेलियाचे चिमुकले विमान वावटळीतल्या पिलासारखे थरथरू लागले. सभोवताली भयाण अंधार आणि पुढे मिणमिणारी मापनयंत्रे ! त्यांच्यांवर सारी भिस्त ठेवून अमेलिया एकटी मार्गक्रमण करत होती. पण थोड्या वेळातच उंचीदर्शकयंत्र निकामी झाले. ढगांच्यामध्ये थोडी फट सापडताच अमेलियाने विमान उंच चढवून वादळाच्या वरून उड्डाण करण्याचा निर्णय घेतला. अर्धा तास ती वर वर जात होती. अखेर काचेवर आणि पंखावर बर्फ साचू लागले, वेग निदर्शकही बंद पडला आणि अमेलियाचे विमान पुच्छवलयात (Taispin) सापडून खाली कोसळू लागले. जवळ जवळ ३००० फूट खाली कोसळल्यावर पंखावरील बर्फ वितळला आणि अमेलियाच्या विमान सरळ करण्याच्या प्रयत्नाला यश आलं. थोडंही न डगमगता तिने गिरक्या घेणारं विमान पुन्हा मार्गस्थ करण्याचा प्रयत्न चालू ठेवला होता. विमान सरळ धावू लागलं त्यावेळी खाली काही फुटांवरच समुद्राच्या लाटा उसळत होत्या.

वादळाचे तांडवनृत्य सतत ५ तास चालू होते. पण वादळ शांत होते तोंच आणखी एक संकट अमेलियापुढे उभे राहिले. विमानाच्या उच्छ्वास नलिकेच्या टोकाला आगीची छोटीशी ज्योत दिसू लागली. ही आग पसरत पसरत एंजिनपर्यंत सहज आली असती. "बुडून मरावे लागणार की भाजून ?" असा विचार करत अमेलिया मार्गक्रमण करतच राहिली. आता परत फिरूनही उपयोग नव्हता. सकाळच्या उजेडात आगीची ज्योत दिसेनाशी झाली.

पण थोड्याच वेळात अमेलिया पुढे आणखी एक संकट उभं राहिलं. अपेक्षापेक्षा लवकरच तिला राखीव टाकीतले इंधन वापरण्यास सुरवात करावी लागली, म्हणजे

मुख्य टाकी थोडी थोडी गळत होती तर. आता मात्र कुठेही जमीन दिसली की उतरणे भागच होते. आयर्लंडचा किनारा आता दिसू लागला होता. हिरवीगार कुरणे आणि त्यावर गाईंचे ठिपके! गाई चुकवत चुकवत अमेलियाने एका कुरणात आपले विमान उतरवले. आश्चर्याने थक्क झालेल्या शेत मालकाला "मी ना? आत्ताच अमेरिकेहुन आलेय!" असे सांगून तिने आणखी एक धक्का दिला.

येथून खरी अमेलियाच्या सार्वजनिक जीवनाला सुरवात झाली. युरोप आणि अमेरिकेत सर्वत्र तिचे सत्कार, मानपत्र, मेजवान्या, व्याख्याने, पदके यांनी स्वागत होऊ लागले. पोत्यावारी चाहत्यांची पत्रे तिला रोज येऊ लागली. अगदी छोटया छोटया मुलांचीसुद्धा.

पुढची ५ वर्षे ए. ई. व्याख्याने देत होती, लेख लिहीत होती आणि नवे नवे उच्चांक प्रस्थापित करीत होती. 'ऑटो गामेरा' (हेलीकॅप्टर सारखे एक विमान) चालविणारी पहिली स्त्री! विशिष्ट उड्डाण पदक (Distinguished Flying Cross) मिळवणारी पहिली स्त्री! पॅसिफिक ओलांडणारी पहिली स्त्री! जानेवारी १९३५ मध्ये मेक्सिको सिटी ते न्यूजर्सी हे २,११५ मैलाचे अंतर तिने १८ तास १८ मिनिटात कोठेही न थांबता काटले.

अमेलियावर स्तुतिसुमनांचा वर्षाव होऊ लागला. पण तिने स्त्रीगर्व बाळगला नाही. अवास्तव स्तुतीने भरलेली पत्रे, गाणी, कविता इ. तिने 'रद्दी' या सदराखाली फाईल करून टाकल्या होत्या.

स्तुतिप्रमाणेच अमेलियाला टीकाकारांनाही तोंड द्यावे लागले. कुणी तिला उतावीळ, चक्रम, भडक डोक्याची, प्रसिद्धीसाठी हपापलेली, स्टंटबाज अशी अनेक विशेषणे बहाल केली. या टीकाकारांना अमेलिया उत्तर देई – 'केवळ एकादे धाडसी कृत्य करण्याच्या तीव्र इच्छेखातर ती करणे म्हणजे पाप नव्हे! माणसाची प्रगती अशा उपक्रमातूनच झाली आहे.'

इंडियाना येथील पुर्डू विद्यापिठात विमानोड्डाण सल्लागार या पदावर तिची नेमणूक करण्यात आली. 'जीवनातली मौज अनुभवण्याचा प्रयत्न करा, कारण मौज ही कुठल्याही कार्यातील अत्यावश्यक बाब आहे.' हे आपले आवडते तत्वज्ञान ती विद्यार्थिनींना शिकवू लागली.

विद्यापिठाने तिला रॉकहीड 'इलेक्ट्रा' हे त्याकाळातील अत्याधुनिक विमान घेऊन दिले. ताशी १८० मैल नेहमीचा वेग (Cruising speed), ४००० मैलाची मर्यादा (Range) आणि सर्व आधुनिक उपकरणांनी सज्ज असणारे हे विमान होते.

१९३७ सालच्या सुरवातीसच अमेलियाने न्यूयॉर्कला पत्रकार परिषद बोलावली. छायाचित्रकार आणि पत्रकारांच्या गर्दीसमोर पृथ्वीचा एक मोठा गोल ठेवून अमेलियाने आपली नवी मोहीम जाहीर केली. शक्य तो विषुववृत्ताजवळून उड्डाण

करूण विमानातून पृथ्वी प्रदक्षिणा पूर्ण करण्याची. साधारण अंतर २७००० मैल.

'तुम्ही एकट्याच जाणार काय ?'

एवढ्या दीर्घ प्रवासाला स्वतंत्र दिशा-दर्शक (Navigater) असावा लागतो.' ए. ई. बरोबर येणारे नॅव्हीगेटर नूनान यांची ओळख करून देण्यात आली.

'किती काळ लागेल या उड्डाणाला ?'

'निश्चित सांगता येणार नाही. असा प्रवास पूर्वी कोणीही केलेला नाही. मी शर्यत न करता जमेल तसा प्रवास करणार आहे.'

'हे धाडस करण्याचे कारण ?'

'मला तसे वाटते म्हणून ! विमानोड्डाण म्हणजे मौज असते. आणि माणसाने थोडा धोका पत्करायला हवाच !'

## मोहिमेची तयारी

यापूर्वी कित्येक महिने अमेलिया मोहिमेची तयारी करीत होती. नकाशे पैदा करून त्यानुसार हवाई मार्ग ठरविणे, अंतरे व प्रदेश यांची माहिती करून घेणे, हवाईतळ कोठे आहेत, आणिबाणीच्या परिस्थितीत कुठे उतरणे शक्य आहे, त्या त्या भागातील वाऱ्याची दिशा, हवामानाचा अंदाज, या साऱ्या गोष्टी काळजीपूर्वक अभ्यासाव्या लागल्या. ज्या ज्या ठिकाणी ती उतरणार होती तिथे विमानाकरता लागणारे खास इंधन आणि तेल पुढे पाठवून साठवून ठेवावे लाणार होते. तसेच विमानाचे सुटे भागही.

प्रथम पश्चिमेच्या दिशेने उड्डाण करून पृथ्वीप्रदक्षीणा करण्याचा अमेलियाचा विचार होता. पण उड्डाणाच्या पहिल्या फेरीतच हवाईतील होनोलूलू तळावरून निघताना तिच्या विमानाचा एक टायर फुटला. विमान कलंडले, चाक मोडून पडले आणि पुढच्या दोन्ही पंख्यांचे तुकडे झाले. विमान परत कॅलिफोर्नियाला दुरुस्तीसाठी पाठवावे लागले. दुरुस्तीला तीन महिने लागेल आणि तोपर्यंत ऋतू बदलेले. वादळे, मान्सून पाऊस, धुके, साऱ्यांचा अमेलियाला पुन्हा अभ्यास करून अंदाज बांधावा लागला. कॅलिफोर्निया ते पिसामी उड्डाण करून अमेलियाने दुरुस्त विमानाची चाचणी घेतली.

१ जून १९३७. अमेलिया आणि तिचा दिशादर्शक फ्रेडरिक नूनान मियामी विमानतळावरून निघाले. निरोप द्यायला अमेलियाचे पति जॉर्ज पुटनॅम होते. नूनान हे पॅन अमेरिकन विमान कंपनीचे वैमानिक होते. त्यांनी आतापर्यंत अठरा वेळा पॅसिफिक महासागर पार केला होता. ते एक कसलेले दिशादर्शक आणि वैमानिक होते. एक महिन्यापूर्वीच त्यांचा विवाह झाला होता. नववधू बिॲट्रिस कॅलिफोर्नियात त्यांच्याकरता थांबली होती. ४ जुलैला परत येऊन स्वातंत्र्यदिन साजरा करण्याचे त्यांनी पत्नीला वचन दिले होते.

निघण्यापूर्वी अमेलियाने आपल्या पतीला एक बंद लिफाफा दिला. 'मी परत

आले नाही तर उघडावयाचा' असे त्यावर लिहिले होते.

सर्व स्थिरस्थावर होऊन प्यूर्टोरीकोच्या दिशेने विमान जाऊ लागल्यावर अमेलियाने रेडिओ चालू केला. तिच्या उड्डाणाच्या चित्तथयरक घटनेचे धावते वर्णन रेडिओवर सर्वत्र चालले होते. 'मी लहान होते तेव्हा एक मोडक्या बग्गीत बसून जगप्रवासाच्या कल्पना करीत असे.' ती नूनानला सांगू लागली. 'पण आज...आज हे प्रत्यक्षात घडत आहे.'

आपल्या प्रवासवर्णनाचे पुस्तक लिहिण्याच्या उद्देशाने अमेलिया टाचणे लिहून प्रत्येक टप्प्याहून आपल्या पतीकडे टपालाने पाठवीत असे. या टाचणांतील नमुन्यादाखल काही उतारे अमेलिया ही एक उत्तम साहित्यिक होती हे दर्शविण्यास पुरेसे होतील.

बहामा बेटे–अँड्रॉस बेट एखाद्या हिरव्यागार गालिच्यासारखे आमच्यापुढे अंथरलेलं दिसत होतं. समुद्राचे रंगीबेरंगी तणावे हाताच्या बोटांसारखे भूभागात शिरलेले दिसत होते. पुरातन काळातल्या कोण्या दुर्घटनेची ग्वाही देणारे फुटलेल्या गलबताचे अवशेष एका किनाऱ्यावर दिसत होते.

धूसर अंतरावर दिसणाऱ्या व्हेनेझुएलाच्या किनाऱ्याच्या रूपाने आम्हाला दक्षिण अमेरिकेचं पहिलं दर्शन घडलं. जरा जवळ आल्यावर घनदाट झाडींनी आच्छादलेले डोंगर आणि त्यांच्यामध्ये विस्तीर्ण पठारे आणि जंगले दिसू लागली. जंगल असे मी यापूर्वी कधी पाहिलेच नव्हते...वैमानिकाच्या दृष्टीने विमान उतरवण्यारता जंगलाइतकी वाईट जागा कुठलीच नसते.

३ जूनला आम्ही व्हेनेझुएला सोडलें, त्या वेळी पावसाचे ढग सगळ्या बाजूंनी भरून आले होते. पावसाच्या सरींशी लपंडाव खेळत आम्ही पुढे चाललो होतो. अखेर सृष्टिशोभेचा मोह सोडून मी विमान ढगातून वर काढलं. ८००० फुटांवर आल्यावर काही थोडे लोकरीच्या पुंजक्यांसारखे छोटे ढग तेवढे आमच्यापेक्षा वर राहिले...जमिनीवर कोसळणाऱ्या पावसाच्या सरी मला स्पष्ट दिसत होत्या. भोवताली वेढलेल्या घनदाट आवरणापलीकडे किती अल्प अंतरावर स्वच्छ सूर्यप्रकाश असतो याची जमिनीवरच्या कितीजणांना कल्पना असेल बरे ?

नाताळ–ब्राझील. इथलं जेवण इतकं सुरेख आणि अगदी घरच्यासारखं होतं की आपण इतक्या दूर आलो आहोत हे खरं वाटेना. पण उगीच भरपेट खाता कामा नये ! ६ पौंड वजन म्हणजे १ गॅलन इंधनाची जागा !

७ जून–आम्ही आफ्रिकेच्या भूमीवर चाके टेकली. ३ खंडे ओलांडली. आता राहिले आशिया आणि ऑस्ट्रेलिया.

अमेलियाने केलेले कलकत्त्याचे वर्णन आजही फारसे बदललेले आढळणार नाही. विमानतळावरून आमच्या यजमानांचे घरी जाताना आम्हाला कित्येक रिक्शा दिसल्या. रस्ते खूपच रुंद होते. पण नानाप्रकारची वहानं आणि शुभ्र पोशाखातले असंख्य लोक यांनी ते भरलेले होते. मोकाट गाई आणि बैल रस्त्यातून आणि फूटपाथवरून स्वैर संचार करत होते. उंच ऑफिसच्या इमारती आणि छोटी छोटी दुकाने शेजारी शेजारी नांदत होती. एका चित्रपटगृहात शर्ले टेंपलचा 'कॅप्टन जॅन्युआरी' लागला होता.

लाए. न्यू गिनी. आमचं विमान आता पॅसिफिकच्या किनाऱ्यावर विश्रांती घेत आहे. दूर क्षितिजापलीकडे कुठेतरी कॅलिफोर्निया आहे. २२,००० मैल प्रवास पूर्ण झाला आहे. आता फक्त ७००० मैल राहिले आहेत.

यापुढे ए. ई. आणि नूनान यांना सर्वांत मोठा टप्पा ओलांडून जायचे होते, २,५५६ मैल दूर पॅसिफिक महासागरात पाण्याच्या वर थोडेसे फूटच आलेल्या २ मैल लांब आणि अर्धा मैल रुंद हौलॅंड बेटावर. त्याच्या उत्तरेस ४० मैलांवर बेकर बेट होतं. याव्यतिरिक्त चारही बाजूस शेकडो–हजारो मैल नुसतं पाणी पसरलेलं होतं. या प्रचंड जलाशयातलं हे बेट नेमकं शोधणं म्हणजे टेक्सास राज्यात पडलेला एखादा हातरुमाल शोधण्यासारखं होतं.

बेट सापडायला सोपं जावं म्हणून अमेरिकन किनारा रक्षकदलाची इटास्का ही नौका बेटाजवळ सज्ज होती. अमेलियाशी बिनतारी संपर्क ठेवणे, तिला हवामानाचे अहवाल पुरवणे आणि स्थानदर्शक संदेश (Homing Signals) पाठवणे ही या नौकेची कामे होती.

नूनान यांना संपूर्ण मार्गात उपयोगी पडतील अशा खाणाखुणा (Land Marks) काहीच नव्हत्या. रात्री ताऱ्यांच्यावरून निश्चित दिशा समजेल तेवढीच. तरीही ए. ई. ला अतिशय काटेकोरपणे विमान चालवावं लागणार होतं. नूनान यांच्या होकायंत्र गणतेत केवळ १ अंशाची चूक झाली असती तरी दर ६० मैलांमागे १ मैल चुकीच्या दिशेने ते गेले असते.

लाए येथे विमानातील ५० वॅटचा रेडिओ नीट काम देत नव्हता. काही मापनयंत्रेही चालू करायला नूनान यांना प्रयास पडले.

२ जुलै १९३७ ला ए. ई. ने लाए तळ सोडला. हौलॅंड बेटावर त्या दिवशी १ तारीख होती. कारण आंतरराष्ट्रीय दिनरेषेच्या जरा पलीकडे हे बेट होते. ए. ई.ला वाटले, आपण भूतकाळात प्रवास करतो आहोत. पण तिला बिचारीला काय कल्पना की, आपण भूतकाळात नव्हे तर अनंत काळात विलीन होण्याकरता प्रवासाला सुरुवात करत आहोत!

आपल्या बिनतारी टप्प्यात ए. ई. चे विमान येण्यापूर्वीपासूनच 'इटास्का'

नौकेने तिला हवामानाचे अहवाल आणि स्थानदर्शक संदेश पाठविण्यास सुरुवात केली होती. नौकेवरील छोटेखानी बिनतारी घरात पाच कामगार तिचा आवाज केव्हा ऐकतो या उत्सुकतेने जमले होते.

समोरून वहाणाऱ्या जोराच्या वाऱ्याने ए. ई. च्या विमानाचा वेग कमी पडत होता आणि इंधन मात्र जास्त जळत होते. पहाटे २–४५ ला तिचा अस्पष्ट आवाज रेडिओवरून आला. त्यातले . वादळी आणि ढगांनी घेरलेलं .. एवढे दोनच शब्द कळू शकले. रेडिओवर अतिशय खरखर येत होती.

रात्रभर इटास्कावरील तंत्रज्ञ तिच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न करीत होते. तुमचा आवाज आम्हाला ऐकू येत नाही असे त्यांनी सांगितले दुसऱ्या लहरींवर प्रयत्न करण्याची आणि निदान नुसता कडकट्ट संदेश पाठवण्याची त्यांनी सूचना केली. ए. ई. कडून काहीही उत्तर आले नाही. याचा अर्थ त्या अनुभवी लोकांनी बरोबर लावला–ए. ई. चा रेडिओ व्यवस्थित काम देत नव्हता.

दिवस उगवला. स्पष्ट आणि स्वच्छ. इटास्काचे कॅप्तान थॉम्पसन यांनी ए. ई.ला निर्धोक उतरता यावं याकरता किनाऱ्यावरचे हजारो पक्षी हाकून लावले. तिला मार्गदर्शन करण्याकरता बोटीच्या धुराड्यातून धुराचे उंचच उंच लोट आकाशात सोडले.

७–४२ ला रेडिओतून शब्द उमटले, 'आम्ही तुमच्या जवळपासच आहोत पण तुम्हाला पाहू शकत नाही. इंधन संपत आले आहे. रेडिओसंपर्क साधला नाही. आम्ही १००० फुटांवर आहोत.

७–५७ 'आम्ही घिरट्या घालत आहोत. पण बेट कोठेच दिसत नाही. तुमचा आवाजही येत नाही.

इटास्काने स्थानदर्शक संदेशाची मालिका ध्वनिक्षेपित केली.

८–०३. इअरहार्टकडून इटास्काला. तुमचे संदेश मिळत आहेत, पण दिशा ठरवण्याइतपत जोराचे नाहीत.

इटास्काने लगेच उत्तर पाठवले, पण त्याची पोच मिळाली नाही.

८–४५ वाजता शेवटचा संदेश आला. ए. ई. झपाट्याने बोलत होती. '...आमची स्थिती १५७·३३७. उत्तर–दक्षिण दिशेने आम्ही जात आहोत. हाच संदेश पुन्हा देऊ...' संदेश अस्पष्ट होत गेला.

नौकाप्रमुख थॉम्पसन आकाश न्याहाळत डेकवर चकरा मारीत होते. उगवत्या सूर्याच्या तेजामुळे आपले धुराचे लोट तिला दिसले नाहीत काय? त्यांच्या अंदाजाप्रमाणे ए. ई. या वेळपर्यंत बेट ओलांडून पुढे गेली होती, आणि भर समुद्रावर रिकाम्या इंधन टाक्यानिशी भरकटत होती. ९ वाजता त्यांनी वॉशिंग्टनला संदेश पाठवला. '९ वाजेपर्यंत इअरहार्टची खबर नाही. खाली उतरली असावी. मी शक्यता असणारा परिसर धुंडाळत आहे. शोध चालूच ठेवतो.'

तात्काळ अमेरिकन नौदलाचे प्रमुख लिही यांनी अमेलियाच्या शोधासाठी सर्व प्रयत्न करण्याचा हुकूम सोडला आणि इतिहासातील एका अभूतपूर्व सुटकापर्वाला आरंभ झाला. एक मोठे लढाऊ जहाज, एक सुरंग शोधणारे, एक विमानवाहू, चार विनाशिका आणि ६६ विमाने शक्य त्या वेगाने त्या स्थळी रवाना झाली. वाढत्या व्यापाच्या वर्तुळात फिरून छोटी छोटी विमाने आसपासच्या प्रदेशाचा इंचन इंच शोधून पहात होती, एकूण १ लाख चौरस मैलांचा प्रदेश धुंडाळण्यात आला. ७ जुलैला दोन जपानी जहाजे या शोधमोहिमेत सामील झाली. अमेलिया इअरहार्ट आणि फ्रेड नूनान यांना शोधण्यासाठी चार हजारांहून जास्त लोक प्रयत्न करत होते. या मोहिमेचा रोजचा खर्च २॥ लाख डॉलर्स होत होता.

इकडे कॅलिफोर्नियात अमेलियाचे पती जॉर्ज पुटनॅम रात्रंदिवस जागरूक होते. त्यांनी अद्याप आशा सोडली नव्हती. 'विमानाचे विस्तिर्ण पंख आणि मोकळ्या टाक्या यामुळे ते पाण्यावर तरंगणारच. शिवाय विमानात एक छोटी रबरी नाव, जीवरक्षक पट्टे, मशाली आणि उंच सोडण्याकरता खुणेचा पतंग आहे. खाली जर उतरले तर ते कितीही काळ सुखरूप राहू शकतील.'

२८ जूनला नूनानने आपल्या पत्नीला लिहिलेले एक पत्र तिला ७ जुलैला मिळाले. पत्रात अमेलियाबद्दल त्याने लिहिले होते– 'अशा मोहिमेला अमेलिया अगदी योग्य व्यक्ती आहे. दुसऱ्या कुठल्याही बाईबरोबर मी अशा प्रवासाला तयार झालो नसतो. ती उत्तम सहकारी तर आहेच पण पुरुषांप्रमाणेच संकटाला तोंड देण्याची आणि काम उरकण्याची धमक तिच्यात आहे.'

अशी ही महाधाडसी स्त्री या संकटातून पार पडून निश्चितपणे कुठेतरी प्रकट होईल अशी आशा असंख्य लोक बाळगून होते. त्यामुळेच शेकडो लोकांनी आपण तिचा आवाज आणि मदतीचा संदेश रेडिओवर ऐकल्याचे सांगितले. कोणी मशाली पाहिल्या, कोणी भग्न अवशेष पाहिले. होनोलुलू, सॅनफ्रॉन्सिस्को, सीॲटल, सिनसिनाटी, ठिकठिकाणाहून संदेश येत होते. एका इसमाने तर आपण अध्यात्मिक बळाच्या जोरावर विमान पडल्याची निश्चित जागा दाखवतो असे सांगितले.

अखेर १९ जुलैला ही शोधमोहीम संपवण्यात आली. अमेलियाचा अंत कसा झाला हे अखेरपर्यंत गूढच राहिलं.

तिनं दिलेला लिफाफा तिच्या पतिराजांनी उघडला. त्यात एवढाच संदेश होता, 'केवळ मला वाटलं म्हणून मी हे धाडस अंगिकारलं. स्त्रियांनीही पुरुषांप्रमाणेच अशा गोष्टी करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. त्यात त्यांना अपयश आलं तर त्यांचं अपयश हे इतरांना आव्हान ठरलं पाहिजे.'

□ □ □

# आस्तिक ज्ञानेश्वर नास्तिक ज्ञानेश्वर

देवीदास बागूल

भगवत्‌गीता हा हिंदूंचा सर्वश्रेष्ठ धर्मग्रंथ आहे हे कोणाला माहीत नाही? आणि त्या ग्रंथात देवाचे स्थूल, सूक्ष्म आणि सर्वसमावेशक स्वरूप सांगिलेले आहे याबद्दल कोणाचे दुमत होईल? ज्या कोणाचे दुमत होईल त्याचे होवो, पण त्या यादीत ज्ञानेश्वरांचे नाव घालता येईल काय?

अगदी आडपडदा न ठेवता सांगायचे झाले तर त्या यादीत ज्ञानेश्वरांचें नाव दाखल करता येण्याजोगी परिस्थिती आहे! हे असे म्हणणे फार उद्धटपणाचे होईल हे मी जाणून आहे. कारण सर्वसाधारणपणे पाहिले तर ज्ञानेश्वरांची प्रसिद्धी ज्या कोणत्या प्रमुख गोष्टीसाठी आहे ती गोष्ट म्हणजे ज्ञानेश्वरांनी भगवत्‌गीतेचा केलेला मराठी अवतार!

भगवत्‌गीतेतील देवाबद्दलचे तत्त्वज्ञान मराठी भाविकांना समजावे म्हणून तर त्यांनी ज्ञानेश्वरीसारखा महान ग्रंथ लिहिला. अशा ज्ञानेश्वरांनी भगवत्‌गीतेतील देवविचारापेक्षा वेगळा विचार सांगितला आहे असे कसे म्हणता येईल? देव हा या विश्वातील सर्वश्रेष्ठ आहे, या श्रद्धेला तडा जाईल असे काही त्यांनी कुठे पुसटसे तरी लिहिले आहे याची कल्पना तरी कशी करता येईल?

ज्ञानेश्वरी हा ग्रंथ जर नुसता वरवर चाळला, तर ज्ञानेश्वरांनी देवाच्या श्रेष्ठ-पणाला कुठे धक्का लावला आहे असे आढळणार नाही. उलट ठिकठिकाणी देव कसा अनादि, अनंत, सगुण, निर्गुण, कर्ता, अकर्ता, सर्वव्यापी आहे याबद्दलचे प्रतिपादन नाना दाखले देऊन बिनतोड केल्याचे दिसते. श्रीकृष्णांच्या मुखातून तो सर्वव्यापी परमेश्वरच बोलतो आहे अशी ज्ञानेश्वरांचीसुद्धा भूमिका दिसते. 'मात्रं एकं शरणं व्रज'–'मलाच एकट्याला शरण ये' अशा स्वच्छ आणि स्पष्ट शब्दांतला ईश्वर-

विषयक संदेश ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरीत कुचराई न करता अनुसरला आहे, असे कोणाही साक्षर माणसाला आढळून येते.

अशा प्रकारे देवाबद्दलचा आस्तिकभाव ज्ञानेश्वरांनी दाखवलेला असताना पुन्हा असे कसे म्हणता येईल की, ज्ञानेश्वरांनी देवाच्या श्रेष्ठत्वाला धक्का पोचेल असे भाषण–वर्तन केले आहे ?

परंतु दहाव्या अध्यायातील एक जागा जरा बारकाईने वाचली तर ज्ञानेश्वरांनी असले नास्तिक भाषण आणि वर्तन केले आहे असे म्हणण्यास खूपच जागा आहे. पण हे जे त्यांनी देवाच्या स्थानाला धक्का लावण्याचे कार्य केले आहे ते इतक्या नाजुकपणाने आणि इतके जाताजाता केले आहे की ते कार्य सहसा कुणाच्या लक्षात आले तर यावे, पण डोळ्याला मात्र खुपू नये.

सर्वश्रेष्ठ कोण ठरतो याबद्दलची एक गोष्ट आहे. एका गल्लीत चार शिंप्यांची दुकाने वर्षानुवर्षे होती. एकदा ते रात्रीच्या वेळी गप्पा मारायला एकत्र जमले. प्रथम परनिंदा करून झाल्यावर जो तो आत्मस्तुतीकडे वळला. एकजण म्हणाला, ‘या सबंध जिल्ह्यात सर्वांत हुशार शिंपी जर कोणी असेल तर तो मीच आहे.’ त्यावर दुसरा म्हणाला, ‘जिल्ह्याचं काही मला सांगता येणार नाही, पण या तालुक्यात मात्र मीच श्रेष्ठ आहे असं मी नम्रपणे सांगू इच्छितो.’ आता पाळी तिसऱ्याची होती. तो एक डोळा बारीक करून म्हणाला की, ‘मी तर कधी या गावाच्या बाहेर पडलो नाही. तेव्हा जिल्हा-तालुक्याचं काही मला माहीत नाही. पण या गावापुरतंच बोलायचं ठरलं तर मीच या गावात श्रेष्ठ आहे.’ हे सगळं झाल्यावर तिघे चौथ्याकडे पाहू लागले. तो शांतपणे म्हणाला की, ‘मी फक्त या गल्लीत असलेल्या शिंप्यांमध्ये श्रेष्ठ आहे.’ या उत्तरामुळे बाकीच्या तिघांचे चेहरे खर्रकन उतरले.

ज्ञानेश्वरांना ही गोष्ट माहीत होती की नाही याची काही कल्पना नाही. परंतु दहाव्या अध्यायात विभूतीयोगाच्या विवरणाच्या वेळी त्यांनी ज्या प्रकारे भाषण केले आहे, किंवा अधिक नेमके सांगायचे म्हणजे ज्ञानेश्वरांनी मराठीतील श्रीकृष्णाच्या तोंडी जे उद्‌गार घातले आहेत ते पाहाता त्यांनी चौथ्या शिंप्यावरही मोठी मार्मिक मात केली आहे असे वाटते.

दहाव्या अध्यायात श्रीकृष्ण अर्जुनाला सांगतो की, ‘या सर्व जगाचे मूळ मीच, आणि अर्जुना, माझ्यापासून या सगळ्याची स्थितिगती चालते.’ त्यावर अर्जुन विचारतो की, ‘ज्या विभूतींच्या योगाने या अनंत विश्वाला तुम्ही व्यापून टाकता त्यातील मुख्यमुख्य विभूती मला सांगा.’

ही विनंती मान्य करून कृष्ण विश्वातील मुख्यमुख्य विभूती सांगतो. तो म्हणतो की, ‘ज्या ज्या वस्तूत उदात्तता आहे त्या त्या वस्तूत मी आहे. वेदांमध्ये सामवेद जो आहे तो मी आहे, वृक्षकोटीत माझी प्रधान विभूती पिंपळ आहे, सर्व अश्व-

जातीत उच्चैःश्रवा मी. महिन्यांमध्ये मार्गशीर्ष महिना मी आहे, ऋतूंमध्ये मी वसंत-ऋतू आहे,' इत्यादी मुख्यमुख्य विभूती सांगून झाल्यावर कृष्ण म्हणतो की, 'तुम्हां पांडवांमध्ये जो अर्जुन, तो मीच समजावा.'

अशा प्रकारे देवाचे सर्वव्यापकत्व आणि सर्वश्रेष्ठत्व सांगणारा श्रीकृष्ण 'ज्ञानेश्वरीत' (गीतेत नव्हे) अर्जुनाला मात्र स्वतःपेक्षा श्रेष्ठ समजतो. नुसते समजतो असे नव्हे, तर तसे तो स्पष्ट बोलूनही दाखवतो. ज्ञानेश्वर त्या प्रसंगाचे वर्णन करताना लिहितात की, 'आपण स्वतः ब्रह्मदेवाचे जनक आहोत, या गोष्टीची जणू काय आपणास स्मृतीच नाही, अशा भावाने श्रीकृष्ण अर्जुनाला म्हणाले की, बा अर्जुना तू फारच उत्तम बोललास. याप्रसंगी श्रीकृष्णांनी अर्जुनाला बापा म्हटले याबद्दल आम्हांस (म्हणजे ज्ञानेश्वरांस) आश्चर्य वाटण्याचे कारणच नाही. कारण ते स्वतः नंद गवळ्याचे पुत्र होतेच की नाही. प्रस्तुत प्रसंगी अशा प्रकारचे शब्द प्रेमाच्या अतिरेकामुळेच (आवडीचा अतिसो) उमटले होते.'

प्रेमाच्या तीव्रतेमुळे देवविषयक अद्‌भुतावर मात होऊन भौतिक नात्यांचा प्रभाव पडतो अशा प्रकारचा विचार प्रत्यक्ष विभूतीयोगाच्या प्रसंगी सांगण्यात ज्ञानेश्वरांनी एक नवीन विचार सांगितला आहे.


तसे पाह्यचे म्हटले तर परमेश्वराला आपले भक्त आवडतात, त्यांच्यासाठी तो संकटकाळात धावून जातो वगैरे अद्‌भुत गोष्टी नेहमीच्या आहेत. 'यो मे भक्तः स मे प्रियः' 'जो माझ्या प्रेमळ भक्तीने रंगून गेला आहे तो भक्त मला प्राणप्रिय होतो.' असे वचन गीतेतही ठिकठिकाणी आहे.

पण ही तर सरळसरळ देवघेव झाली. त्यात देव विशेष ते काय साधतो? परंतु ज्ञानेश्वरीतील मराठी कृष्णाचे ब्रीद मात्र नवे दिसते. त्या कृष्णाचे ज्याच्यावर प्रेम आहे ती व्यक्ती त्याला स्वतःपेक्षा श्रेष्ठ वाटते. त्या प्रेमापुढे मग स्वतःचे श्रेष्ठत्वही ठेंगणे होते. ज्ञानेश्वरांनी कृष्णाच्या रूपाने प्रेमाची ही मूलभूत मानवी कल्पना फार रसरसून ठायी ठायी मांडली आहे.

आपल्यावर लोकांनी प्रेम करावे असे प्रत्येकालाच वाटते. पण तसे घडले नाही, म्हणजे माणूस दुःखी होतो, निराश होतो, उदास होतो. या दुःखी संसाराचे सुखी संसारात रूपांतर करण्यासाठी देवभक्तीऐवजी दुसऱ्यावर उत्कटतेने प्रेम करण्याची दृष्टी ज्ञानेश्वर देऊ पाहातात. आणि असे उत्कट प्रेम करण्याचे सामर्थ्य कोणत्या नात्यामुळे मिळते तेही सांगतात. ज्ञानेश्वर म्हणतात की मैत्री हेच एक त्या नात्याचे निर्मळ रूप असू शकते. म्हणून त्यांनी ज्ञानेश्वरीत अर्जुनाला आतेभावाऐवजी 'मैत्रियेचा कुवासा' मैत्रीचे आश्रयस्थान म्हणूनच संबोधले आहे.

दुसऱ्यावर जर आपले उत्कट प्रेम असले तर तो एक मानवी जीवन सुंदर करणारा अमोल ठेवा आहे. मात्र ते प्रेम इतके उत्कट असावे की ज्यावर ते प्रेम

पृष्ठ ३१ वर




## मी

रोज येतो रोज जातो
नित नवीन मी रोज होतो
वल्कलाना टाकुनिया
सूर्य रात्री चंद्र होतो

कालचा ना आज मी
आजचा ना उद्या
बदलणारे शुक्र तारे
तारका ह्या नग नद्या

कोण कुठला ? काय कसले ?
माझ्याविना ते सत्य कसले ?

सर्वभूति राहुनिया
तेज माझे त्यात हसले

वाहतो मी साहतो मी
आणि सारे पाहतो मी
मीच माझ्या वाढणाऱ्या
तेजामधे नाहतो मी

सरिता मिळे सागराला
सागराच्या सर्व लीला
मीच माझ्या प्रकृतीचा
येथ आहे संसार केला

राजीव

## पंढरी

तू मनोहर नयन गे
मी तयांतील आसवे ।
तू मुलायम ओठ गे,
मी तयांतील स्मित-रवे ।
तू मधुरव कंठ गे,
मी तयांतील गोड गळा ।
तू सहृदय हृदय गे,
मी तयातील जिव्हाळा ।
तू प्रेमपूर्ण हस्त गे,
मी तयाचाच आशीस ।
तू शतजन्माचे पुण्य गे,
मी तयाचेच फल लोभस ।
तू उदात्त जीवन गे,
मी तयांतील आनंद ।
तू जिवन्त प्रतिमा गे,
मी दो ओळीचा छंद ।
' आई ', तू पंढरी गे,
मी तुझा वारकरी ।

अनिल कोल्हापुरे

## तुला सांगायचंय

नको नको थांबू नकोस,
माझ्यासाठी राहू नकोस
तुझा पराक्रम तुझा जोश
माझ्यासाठी राबवू नकोस

हातीहात घेऊन आलो,
जीवो जीव मिळून गेलो
बंधनी या राहू नकोस
पौरुषाला रोकू नकोस

तुझे तेज प्रखर आहे,
तुझा वेग अफाट आहे
त्या तेजात, तुझ्या वेगात
हे जीवन फुलत आहे

नवनिर्माण घडत आहे,
जनजीवन लढत आहे
समाजवादी भारतार्थी
तुझी आज गरज आहे

कुमुद देसाई

## आस्वाद

---

कवि राजीव यांच्या ' मी ' या कवितेत स्वतःच्या नवोन्मेषी विश्वरूप व्यक्तित्वाचा शोध घेण्याचा प्रयत्न आहे. ' वल्कलांना टाकुनिया, सूर्य रात्री चंद्र होतो ' ही कल्पना फार अर्थपूर्ण आहे. नूतनत्व आणि रम्यत्व या दोन्हींचा त्यात काव्यमय संकर झाला आहे. ' सर्वभूती राहुनिया, तेज माझे त्यात हसले ' ही अशीच दुसरी सर्वव्यापी प्रतिमा. जो अनुभव कवीला सांगायचा आहे, तो जिवंतपणे सांगण्याचे सामर्थ्य अशा प्रतिमांत आहे. स्वतःच्याच वाढत्या तेजात नाहण्याच्या उल्लेखाने ही प्रतिमा पुढे आणखी गडद अर्थच्छटा धारण करते. पण सबंध कवितेत या जिवंत



# डोकं दुखतंय्?
# ॲनासिन
## घ्या नि वेदनापासून आराम मिळवा
## ते प्रभावी नि सुरक्षित असल्याने उत्तम ठरते



हॉटेल मालक श्री. दत्ता कदंब म्हणतात, ''मला ॲनासिनपासून त्वरित आराम मिळतो. मी ते घरात नेहमी ठेवतो.''

जगभर डॉक्टर्स ज्या वेदनाशामकाची शिफारस करीत असतात ते ॲनासिनमध्ये भरपूर प्रमाणात असल्याने ॲनासिन **प्रभावी** असते. ॲनासिन घेतल्याने वेदनांपासून जलद आराम मिळतो.

ॲनासिन **सुरक्षित** ही असते—कारण, डॉक्टरांच्या निर्धोक मिश्रणाप्रमाणेच त्यात अनेक औषधी घातलेल्या असतात. मुलांनाही ते बिनधोकपणे देता येते—इतर औषधांसाठी तुम्ही डॉक्टरांचा सल्ला घेता त्याप्रमाणेच मुलांना किती ॲनासिन द्यायचे यासंबंधी त्यांना विचारा.

*सर्दीपडसे, फ्लू, डोकेदुखी, पाठदुखी, स्नायुदुखी आणि दातदुखी यांवर ते अतिशय प्रभावी असते.*

# ॲनासिन
**भारताचे अत्यंत लोकप्रिय वेदनाशामक**

Regd. User of TM : Geoffrey Manners & Co., Ltd.



४ प्रकारे कार्य करते

प्रतिमा स्पष्टीकरणात्मक निवेदनाच्या आवरणात गुदमरलेल्या आहेत असे जाणवते.

अनील बी. कोल्हापुरे यांची ' पंढरी ' ही कविता म्हणजे एका रूढ प्रतीकरचनेतून मांडलेले मातृभक्तीचे भावदर्शन आहे. ही एक रूपकांची माला आहे. नयन आणि आसवे, ओठ आणि स्मित, कंठ आणि सूर, हृदय आणि जिव्हाळा, हात आणि आशिर्वाद यांसारख्या शारीर उपमानांतून आणि जीवन आणि आनंद, पुण्य आणि फलित, प्रतिभा आणि छंद, पंढरी आणि वारकरी यांसारख्या भावमय उपमानांतून आईशी एकरूपता आणि आधाराश्रय दाखवला आहे. कवीची भाषा मुलायम आहे. सर्वच प्रतिमानांमधून उदात्ततेचा धागा कायम राखण्यातही कवीला यश मिळालेले आहे. आई व पंढरी यांतील भावसमतोल विशेष हृद्य आहे.

' तुला सांगायचंय् ! ' या कवितेत कुमूद देसाई यांनी एका वेगळ्या प्रेमिकेच्या भावना सांगण्याचा प्रयत्न केला आहे. आपल्या व्यक्तिगत भावकोषाच्या पलीकडे पाहणारी ही प्रेमिका आपल्या बंधनात न राहाण्याची उलटी विनवणी आपल्या प्रियकराला करते आहे ! आजवरचा जीवनप्रवास तिने त्याच्या सांगाती केला आहे. त्याच्याशी ती एकरूप झालेली आहे. पण त्याच्या प्रखर तेजात आणि अफाट वेगात आपल्याप्रमाणेच सर्व भारताचे जीवन फुलत राहावे असे तिला वाटते. समाजवादी भारताला त्याची गरज असल्याचे ती त्याला सांगते. व्यक्तिगत भावतरंग आणि समाजवादी भारताचा उल्लेख यातले अंतर येथे फारशा कौशल्याने सांधलेले नाही.

— रसिक

---

## आस्तिक—नास्तिक

पृष्ठ २७ वरून

आहे तो सर्वश्रेष्ठ वाटावा ! (असतो की नसतो तो प्रश्न वेगळा.) आणि ही श्रद्धा जर लाभली तर मग त्या श्रद्धेमुळे आपले स्वतःचे मोठेपण पार लयाला जाते; अगदी आपण देव असलो तरी. किंबहुना मग मुळी देव वगैरे अद्भुताची गरजच उरत नाही.

दुसऱ्यावर उत्कट प्रेम करायला सांगून मानवी जीवन सुखी करण्यासाठी तीच एक साधना आहे, ती साधल्यावर देवकल्पनेची गरजच उरत नाही, असे सांगणारे ज्ञानेश्वर हे पहिले बंडखोर नास्तिक होते. दैनंदिन जीवनात ज्याच्याशी आपला संबंध येतो त्यावर उत्कट प्रेम करा म्हणजे ती व्यक्ती सर्वश्रेष्ठ वाटेल असे ज्ञानेश्वरांनी कृष्णार्जुन मैत्रीच्या निमित्ताने फार नाजुकपणे आणि मानवी जीवनावर आस्तिक भाव ठेवून सांगितले आहे. तो नाजुक संदेश जर माणसाने अंगिकारला तर त्याला देवासाठी वणवण करण्याची मुळीं गरजच उरणार नाही. ◻ ◻ ◻

# सरळ मार्गी पुरुष!



तेल्याचा घाणा असतो. घाण्याला बैल असतो. त्याच्या डोळचाला झापड असते. तो चालत असतो. सारखा चालत असतो. अंतर काहीच तुटत नसतं. कारण गोल फिरत असतो तो. पुन्हा पुन्हा तिथेच तो येत असतो.

दिनेशचे तसेच होते. फरक इतकाच की, घाण्याच्या बैलाला कोणीतरी झापड

## भि. शि. स्वामी

बांधतो. दिनेशने ती स्वतःच बांधून घेतली होती. कशाकडेही लक्ष न देता तो त्याच्या मार्गावर चालत होता.

सकाळ-संध्याकाळ शिकवण्या. कॉलेज, आक्काबाईची खाणावळ आणि सदावर्त्यांच्या विशाल वास्तूतली तिसऱ्या मजल्यावरची खोली. दिवसभर तो त्याच्यातच वावरत असायचा.

इतरांच्या बाबतीतही थोड्याफार फरकाने तसेच असते. दिनेशच्या जाग्यावर दुसरा कोणी असता तर त्याने तिसऱ्या मजल्यावरून खाली उतरताना आसपासच्या खिडक्यांत डोकावलं असतं. स्नो, पावडरखाली झाकलेल्या चेहऱ्याच्या मंद स्मिताला स्निग्ध स्मिताचा प्रतिसाद दिला असता. कठड्यावर अडकवलेल्या शेजाऱ्याच्या कुंडीतील रोपट्यावरच्या फुलाला हात लावला असता. सदावर्त्यांच्या वास्तूत डोळ्याला आणि मनाला आकर्षित करण्यासारख्या बऱ्याच चीजवस्तू आणि व्यक्ती होत्या. परंतु दिनेश आपला झापड लावलेल्या बैलागत सरळ वर जायचा आणि सरळ खाली यायचा. मध्यंतरी कशातच त्याचे डोळे किंवा मन गुंतत नव्हते.

दिनेश कॉलेजात होता म्हटल्यावर त्याच्या आयुष्यात प्रेम, पोरी येणे स्वाभाविक. परंतु तसला काहीच प्रकार नव्हता. नाकासमोर पाहून चालत यायचा आणि ठराविक बाकावर बसायचा. वर्गात जे काही शिकवणं चाललेलं असायचं त्यातच लक्ष असायचं त्याचं.

असा विद्यार्थी स्कॉलर असायला हरकत नाही. परंतु तसाही प्रकार नव्हता. जेमतेम पास व्हायचा तो. मैदान तर गड्याला माहीत नव्हतं. सक्तीच होती म्हणून एन्. सी. सी. त दाखल झाला होता.

अशा या व्यक्तीकडे कोणाचेच लक्ष नव्हते. त्याला कोणी मित्र नव्हता. मग मैत्रिणी कशा असतील. एक नगण्य व्यक्ती होती.

एक दिवस याच दिनेशचं नाव सगळ्यांच्या तोंडात आलं. आश्चर्यच झालं. स्वतः दिनेशलाही ते आश्चर्यच वाटलं होतं. किंबहुना महदाश्चर्य.

झालं काय; एकदा तो कॉलेज संपल्यावर परतायला लागला होता. पायऱ्या उतरला. शेवटच्या पायरीवर पाय असेल त्याचा. तोच हाक आली, " दिनेश. "

त्याने मागे पाहिले. मालशांची मंदा. वर्गातलीच नव्हे तर कॉलेजमधली सर्वांत सुंदर मुलगी. अभ्यासात हुशार, खेळात तशीच, नाटकातून आहेच, वक्तृत्व स्पर्धांत आहेच. मासिकाची संपादिका आहेच. थोडंसं गायची. सगळ्याच गुणांचं मिश्रण.

अख्खं कॉलेज मरायचं तिच्यावर. पोरंच काय, चांगले चांगले सभ्य म्हणविणारे लेक्चररसुद्धा लाईन टाकायला पाहायचे. परंतु ती भली वस्ताद. कामास काम. जास्त जवळीक कोणाशीच नाही. आणि अशा प्रकाशझोतात असलेल्या मंदा मालशेनं दिनेशला हाक मारली. तिच्या पाठीमागचा पोरांचा ग्रुप आणि पोरींचा कंपूसुद्धा आश्चर्यचकित झाला.

दिनेश थांबला होता तिथे आणून तिने आपली स्कूटर थांबवली.

" बसा ना. "

" मी... मला... " तो गडबडला.

" बसा हो ! " ती.

तो बसला. तिची स्कूटर निघून गेली. तशी पोरं, पोरी फिदी फिदी हसायला लागली. कोणी दिनेशच्या वेंधळटपणाला, कोणी आपल्याच दैवाला.

स्कूटर एका हॉटेलाच्या जवळ थांबली. दोघं उतरली. मंदाच पुढं होती. तिच्या मागोमाग तो एका फॅमिली रूममध्ये घुसला. वेटरने पाण्याचे ग्लास दिले. ऑर्डरकरिता आदबीनं थांबला. मंदानेच आमलेटची ऑर्डर दिली.

हा समोर बसला होता. मंदाची नजर चुकवून तिला निरखीत होता. छाती धडधडत होती. मंदाने हात पुढे करून त्याचा हात आपल्या हातात घेतला. त्याला वेगळ्या जगात गेल्याचा भास व्हायला लागला. त्या जगात गुलाबी रंगाचं उबदार बर्फ पसरलं होतं. तो त्या बर्फावरून घसरत होता. अचानक त्याने आपला हात तिच्या हातातून सोडवून तिचा आपल्या हातात घेतला आणि दाबला. आवेशाने.



"शूऽऽ!"

"आँ..."

"केवढ्याने."

"चुकलो." म्हणत त्याने हात सोडला.

वेटरने आमलेटच्या प्लेटस् आणल्या. ती खायला लागली. त्याचे लक्ष खाण्यात नव्हते. गुलाबी बर्फावरून घसरायला त्याचे मन मागत होते.

"तुम्ही वर्गात अगदी अलिप्त का असता?"

तो सावरला. म्हणाला, "तसं काही नाही. पण असतो खरा."

"कारण तरी सांगाल."

"खास नाही."

"मैत्री करण्यासारखं कोणीच दिसत नाही तुम्हाला?"

"तसं म्हणा."

"माझ्याशी कराल मैत्री."

"हो!" तो लाजत लाजत म्हणाला.

एखाद्या वेड्याच्या चाळचाला हसावं तसं ती हसली. उठली. बिलही तिनंच दिलं. मनात म्हणाली करमणूक झाली. पैसे काही फुकट नाही गेले.

दुसरे दिवशी कॉलेजात तो आलाच नव्हता. ती आली होती. सगळे तिच्याकडे पाहात होते. तिच्या खास म्हणविणाऱ्या दोन-तीन मैत्रिणींनी तिला गाठलं. कालच्या प्रकारचा खुलासा मागितला. उत्तरादाखल ती म्हणाली,

"दिनेशला रुप नाही, तो हुषार नाही, कांहीच नाही, याविषयी खात्री झाल्यावरच मी हेतुपुरस्सर काल तशी वागले."

"म्हणजे?"

"म्हणजे काय? कॉलेजमध्ये प्रत्येकजण माझ्यावर लाईन मारतो, मला त्यांचा सर्वांचा वीट आलाय."

"म्हणून तू त्या खुळ्याबरोवर प्रेम करणार."

"छट् प्रेम कसलं? प्रेमाचं नाटक. सर्वांना दाखवण्यापुरतं. त्यामुळे त्यांचा त्रास निदान कमी व्हावा म्हणून."

आणि ती त्यांच्यापासून पुढे सरकली.

वर्ग सुरू झाला. सगळे दिनेशची वाट पाहत होते. त्याच्या मोकळ्या जागेकडे पाहात होते. तो आलाच नाही.

वर्ग सुटल्यावर एका खट्याळ मुलाने मंदाला विचारले. "मिस्टर दिनेश का नाही आले आज?"

ती हसली आणि शांत आवाजात म्हणाली,

"रात्री आम्हा दोघांचे खूप जाग्रण झाले, त्यांना जागायची सवय नाही. त्यामुळे

थकवा आला. विश्रांतीकरिता घरीच थांबलेत." नंतर थोडं थांबून म्हणाली' "आपलं काही महत्त्वाचं काम होतं? काही निरोप असेल तर सांगेन मी."

त्याला वाटलं आपल्या गालावर पाच बोटं उमटली आहेत. मंदा विजयी हास्य हसली. तिच्या मनात आलं. कोणी कुत्रा पाळतो, कोणी मांजर. आपण दिनेशला पाळायचा. बराच उपयोग होईल. या सर्वांची जिरेल.

कॉलेज संपल्यानंतर ती घरी आली.

बाहेरच तिचे वडील होते ते म्हणाले.

"तुझ्याकडे कोणी तुझा मित्र आलाय. तुझ्या खोलीत मी त्याला बसवलाय."

ती थक्कच झाली. तिला तिच्या वडिलांचा स्वभाव चांगला ठाऊक होता. आता काय होणार?

ती खोलीत गेली, दिनेश बसला होता. तिला दिनेशचा एकदम संताप आला. हे माकड असं काही करेल याची तिला कल्पनाच नव्हती. ती त्याच्या अंगावर ओरडली.

"दिनेश! तुला इथे येण्याची काय आवश्यकता होती?" पुढं ती खूप बोलणार बोलणार होती. परंतु गप्प बसली कारण तिचे वडील खोलीत आल्याचे तिला जाणवले.

आपल्या गालांवरील पांढऱ्या दाढीची खुरटं खाजवीत ते म्हणाले, "रागावतेस कशाला, तुझी निवड मला पसंत आहे. यांनी मला सर्व काही सांगितले आहे. त्यांच्या स्वतःविषयीही सांगितले आहे. बिचारे सरळ मार्गी आहेत. असा माणूस मिळणं कठीण."

"तसं नाही, बाबा गैरसमज."

तिला थांबवीत ते म्हणाले, "गैरसमजाचा प्रश्न नाही. तुमच्या मैत्रीचे आज ना उद्या प्रेमात रूपान्तर होणारच."

"नाही बाबा, तसं नाही. कॉलेजमधल्या सगळ्या रोमिओंची जिरविण्याकरिता मी हेतुपुरस्सर काल तसं केलं. माझं याच्यावर प्रेमबीम काही नाही."

"नसेल, पण त्याचं आहे. बिचाऱ्याला रात्रभर झोप नाही. वाटेल तसं वापरायला पुरुष म्हणजे खेळणी नव्हेत. आता तुला त्याच्याशीच लग्न करायला हवं. मी यांना घरजावई करणार. माझी तू एकुलती एक मुलगी. यासंबंधामुळे जन्मभर माझ्याजवळ राहाशील."

आणि तिचे वडील खोलीबाहेर निघून गेले!

□ □ □

केशव मेश्राम

# पुस्तके

## बोरकरांची ' चैत्रपुनव '

### स्वच्छ आणि प्रकाशमान

श्री. बाळकृष्ण भगवन्त बोरकर हे मराठी कवितेतील सर्वपरिचित असे नाव आहे. एकोणीसशेसत्तर साल तर बोरकरांच्या संदर्भात अधिकच महत्त्वाचे आहे. ह्या साली ठिकठिकाणच्या साहित्य संमेलनात व उत्सवात अध्यक्ष म्हणून बोरकरांचीच निवड झाली होती. मौज प्रकाशनाने त्यांच्या साठीच्या निमित्ताने ' चैत्रपुनव ' हा नवा कवितासंग्रह प्रसिद्ध केला.

वयाची साठी उलटूनही उल्हसित व चिरतरुण मनाच्या कविवर्य बोरकरांच्या ह्या ' चैत्रपुनव 'मध्ये एकूण एकशेबारा कवितांचा समावेश केलेला आहे. बोरकरांच्या कवितेमध्ये आढळणारे जे हमखास गुण : निसर्गप्रेम, रंगगंधप्रतिमांचा वेधक वापर, स्त्री-पुरुष आकर्षणांचे धीट पण कलात्मक चित्रण, जगाच्या संमिश्र अनुभवातून उमटणारे प्रतीतीचे बोल, अज्ञानाची ओढ आणि प्रत्येक सौंदर्यानुभवाला सामोरे जाण्याचा उत्साह, ह्या गोष्टी ह्या संग्रहातूनही मोठ्या प्रमाणात प्रकट झालेल्या दिसतात. इतकेच नव्हे तर, एक आणखी भावच्छटा प्रकर्षाने जाणवते आणि ती ही, की कृतार्थतेचा, परिपूर्तीचा धुंद आनंद.

बोरकरांची काव्यसाधना मनस्वी अशी आहे. आपल्या अवतीभवतीच्या जगत' चे बरेवाईट रंग ते आपल्या श्वासात मिसळून घेतात. कधी आनंदाने त्यांचे मन दुथडीभरून वाहताना दिसते, तर कधी दुःखाने मलूल होते. आपल्याशीच अशी अनेक बहुरूप्यांची ओळख पटवणाऱ्या, बोरकरांच्या कवितातील शब्दाशब्दात याची साक्ष पटते.

' झाड गूढ ' या कवितेतील –

> ' झाड आनंदी स्वच्छंदी होते सुखे जायबंदी
> घावाघावातून ढाळी फुले ज्वाळांची जास्वंदी '

ह्या ओळीतून ही प्रक्रिया स्पष्टपणे प्रकट होते. कवीची संसाराची कल्पना साधीसुधी पण लोभस आहे. ' चार माडांचा संसार ' या कवितेत कवी म्हणतो.

> ' चार माडांचा संसार आहे माझ्या शेजाराला
> जातो राजवर्खी सूर्य त्यांच्या आडूने अस्ताला '

अशा मनाच्या तंद्रीत कवीच्या हृदयात तेजाचे स्फुरण होते. ' कवडसा ' कवितेत बोरकर म्हणतात.

' घटका घटका काळोखातच बसून असतो असा
उतरला गोंजारात नवखा शब्दांचा कवडसा '

हा नवख्या शब्दांचा कवडसा गोंजारतांना कवीला शब्दांच्या जगातील अनेक कोडी उलगडू लागतात. त्याचे मन आपोआपच अव्याजमनोहर अशा बालजगतात प्रवेश करते. त्या जगात, मनात आलेल्या प्रत्येक इच्छेला, पूर्णता असते; प्रत्येक स्वप्नाला, वास्तवाची चौकट असते. ह्यातूनच ' ये ग ये ग परी ' ह्या कवितेतील खालील ओळी आकारास येतात.

' ये ग ये ग परी डोल ज्योतीवर जरा
ओल्या शब्दांवर माझ्या सांड नक्षत्रांचा चुरा '

आणि अशी अवस्था आल्यावर, जे मागण्यासाठी घटका घटका काळोखाची सोबत केली, मनातले शब्द जपले, गोंजारले त्यांनाच हवे तसे, रूप आल्यानंतर मागणीमधील ओढ थांबते. आरंभीची वाचाळी बाजूस पडते आणि एका अज्ञात अशा मौनाचे अपरंपार निळेभोर आकाश कवीच्या हृदयात वस्तीला येते. आता तगमग निवलेली असते. शब्दांना निःशब्दाचाच आकार आलेला असतो. तर्कशुद्धतेच्या सगळ्या पायऱ्या गळून पडलेल्या असतात आणि अनोळखी विश्वातला चिरंतन अनुभव कवीच्या वाट्याला येतो. ' काही शोधायाचे नाही ' या कवितेत बोरकरांनी ह्याच मनोवृत्तीला शब्दाकार दिला आहे. ते म्हणतात –

' नाही बोलायाचे काही; मौन निळाईत गाते
दळी चांदण्याचे पीठ हाताविण माझे जाते '

विरोधी छटांच्या समुचित वापराने बोरकरांच्या कवितेला एक स्वाभाविक गती आलेली दिसते. ' प्रकाश–काळोख ' ही सगळ्याच कवींची नेहमीची विरोधी जोडी; पण बोरकरांच्या कवितेत त्यातून ज्या असंख्य अर्थच्छटा प्रकट होतात, त्यांतून मनाच्या विविध अवस्था ते ज्या सहजतेने शब्दांकित करतात त्याला मराठी कवितेत तरी तोड नाही, असे म्हणावे लागेल. अशा कवितांना आपोआपच आदेशाचे, सुभाषिताचेही वजन आलेले दिसते.

' काय खरे ? काय खोटे ?' या कवितेतील आरंभीच्या ह्या ओळी –

' काय खरे ? काय खोटे ? आलो का हे ? जातो कोठे ?
जीव भ्रमिष्ट आवारा नाही कोठेच निवारा '

आणि अखेरीस त्यांनी वापरलेले एक प्रभावी प्रतीक –

' काय ज्वालांची ही दीक्षा हीच येथली परीक्षा ?
काय आणिलीस वेळ जिणे आगीतली केळ !'

ह्या कवितेची दोन्ही टोके एकत्र आणून तिचा जर सलगतेच्या दृष्टीने विचार केला तर त्यातील ' काय ?' ह्या प्रश्नार्थी रूपाचा प्रभाव जाणवल्याशिवाय राहात नाही.

बोरकरांची ' चैत्रपुनव 'मधील प्रेमकविता अधिक तरल असलेली आढळते. ' दुरावा ' ही ह्या संग्रहातील एक समर्थ कविता: आपल्या मोठेपणामुळे मिळणाऱ्या मानसन्मानामुळे प्रियेमधील व आपल्यामधील वाढणारे अंतर कवीला कातर करताना दिसते.

' तुझ्यामाझ्यात दुरावा आणणारे मोठेपण
गडे याहून बरवे प्राण तोडणारे घण '

' घाव ' या कवितेतील व्यथा, त्याचप्रमाणे ' तुला ' या कवितेतील नर्मसंवाद, कवीच्या मनाची स्पंदने बोलकी करतात. कोजागिरी ही कविता अधिक सूक्ष्म आहे. कवी म्हणतो –

' अजाणता चित्त जाणितले तुझे
तेणे माझे ओझे फूल झाले !'

' तुला पाहून पाहून ',' सरीत भिजून येशील तेव्हा ',' पौषातील ऊन गडे ', ' सून लागला सखे ' ' तूं दूर सखे शहरात तिथे ' या प्रेमकवितादेखील लक्षणीय आहेत; पण अधिक मनोज्ञ आहे ती, ' चंद्र खिडकीतून येतो ' या शीर्षकाची कविता कवीच्या सगळ्या उत्फुल्ल भाववृत्तीचा ह्या कवितेत प्रकर्ष झालेला दिसतो.

' सांगता जे ये न कोणा बोलतो त्याच्याचपाशी
वागलो वेडेपणे त्या तोच होता एक साक्षी '

' खास तू अद्याप जागी, खोल सारी तावदाने
चंद्र खिडकीतून येतो झावळांच्या आडसाने ?

वरील ओळीतील रचनेचा साधेपणाही कवितेच्या यशाला कारणीभूत ठरला आहे.

बोरकरांचा ' चैत्रपुनव ' हा संग्रह अनेक अंगांनी आणि अर्थांनी परिपूर्ण आहे. मानवी आयुष्यातील सगळ्या वृत्तीप्रवृत्तींचा त्यांनी यात वेध घेतलेला दिसतो. आणि हे करीत असताना त्यात कृत्रिमता येऊ दिली नाही हे विशेष आहे. संग्रहांतील बहुसंख्य कविता कवितेच्याच स्वाभाविक ढंगाने विकसित झाल्या आहेत. उपरोधाचीही एक तीक्ष्ण धार चैत्रपुनवेला लाभली आहे. ' मोर इथे एकदाच ' 'वस्त्रे वेळीच सावरा ' ' जोगडे ' या तीन कविता ह्यादृष्टीने तपासता येतील. ' मोर इथे एकादाच ' ही कविता सामान्य विधानाच्या पद्धतीने लिहिली गेली आहे; पण म्हणूनच ती जोमदार झाली आहे.

'मोर इथे एकादाच जावे तिथे कावळेच फार
क्षते हेरीत फिरत असतात दाही दिशा आठहि पार
आमचीदेखील तीच जात म्हणून त्यांना गणतो पितर
पिंड अर्पून आत्मतुष्टीत खूष असतो बाहेर भितर '

' जोगडे ' ह्या कवितेत आपल्या वर्तनाचा एक स्पष्ट आलेख बोरकरांनी चितारला आहे. त्यातले शब्द व परखडपणा यांमुळे त्यातील ओळी सामर्थ्यशाली बनल्या आहेत. बोरकर म्हणतात.

'भीक वाढी त्याला घालू । क्रुद्ध आकाशाचा धाक
सुणे सोडी अंगावर । त्याच्यापुढे धरू नाक '

' वस्त्रे वेळीच सावरा ' ह्या कवितेचा एक चांगला ' पोलिटिकल सटायर 'म्हणून उल्लेख करावा लागेल.

ह्या तीनही उपरोधाची प्रतवारी निरनिराळी असली तरी त्यातील दाहकता आणि अर्थगर्भता मौलिक व सच्ची आहे, यात शंका नाही.

'चैत्रपुनव 'मध्ये आणखी एक प्रभावी सूर आहे; आणि तो स्वाभाविक व सुस्पष्ट असा आहे. आयुष्याच्या एवढ्या वाटचालीनंतर येणाऱ्या मृत्यूच्या हाकांना होकार देण्याची, त्या दृष्टीने मानसिक तयारी केल्याची खूण, त्यांच्या बऱ्याच कवितांतून प्रकट होते.

' स्मशान असावे दोन हाकांवर ' ह्या कवितेमधील

बसावे शिमिटाच्या थंडगार सोप्यावर
उमजून घेत त्याचे इंगित
उत्तरायण वाऱ्यात स्नान करीत
वडाच्या झडणाऱ्या पानांच्या मुकाट तालावर '

ह्या ओळी अंतर्मुख करणाऱ्या आहेत.

' अस्तावल्या दिवसाला ', ' गुलछडी ', ' येणारच नेणारा ' या कवितातही हीच भावना उत्कटतेने साकारलेली दिसते.

' येणारच नेणारा ' ही भाववृत्तीमधील एक प्रभावी कविता. कविवर्य तांब्याच्या शिष्यपरंपरेचा वारसा सांगणारे बोरकरही ' येणाऱ्याच्या 'स्वागताला सहर्ष चित्ताने सामोरे जाण्याची तयारी करताना आढळतात.

' येणारा सुहृद सखे जननांतर-साथी
तृप्तचित्त बघुनि मला नेईल निर्वाती
जाइल जाईत फुलत वाट नागमोडी
येणारच नेणारा, जाणारच होडी '

बोरकरांच्या कवितेतील सौंदर्यस्थळांचा आतापर्यंत आस्वाद घतला. आता त्यांच्या कांही दोषांचा विचार करणे उपयुक्त ठरेल.

काही कविता नुसत्या शब्दलांच्छित बनल्या आहेत. पंडिती पद्धतीच्या रचनेमुळे त्यातील स्वाभाविकता आणि कविताग्ण किंवा गीततत्त्व डागळले गेले आहे. 'आम्ही देखिली अतुल देखणी' ही अशीच एक वाईट लावणी. 'जपानी पोरगी' ह्या कवितेतील मिष्किलपणाही तकलादू व ओढून ताणून आणलेला दिसतो. 'थवे' ह्या कवितेत फुलपांखरांचे रंग सांगण्याचा सोस कवीला आवरला नाही; त्यामुळे एक लांबलचक कंटाळवाणी जंत्री सादर केलेली आढळते. प्रतिमेचा थक्क करणारा उन्मेष यांत नाहीच.

निळे, जांभळे, तांबडे, जर्द पिवळे, हिरवे
काळे, पांढरे, राखेरी, भुरे, पोपटी, पारवे
कोणी उन्हेरी, चंदेरी, कोणी अंजिरी शेंदरी;
मोरपिसापरी कोणी वर्खे ल्यालेले भर्जरी.
कुणी मखमली, मलमली, कुणी बगंदी, वायली
किनखापी मुलायम, कुणी शीतल सायली
कुणा अंगी वेलबुट्टी, चित्रचातुरी गोमटी

अशी ही विशेषणांनी परिपूर्ण कविता वाचून यादीचेही कौतुक वाटून कुणाला कवि-प्रतिभेचा आढळ झाला तर बोलणेच खुंटले! 'माझे चित्त' ह्या कवितेची तसेच 'संग' या कवितेची भट्टी पार पांचट झाली आहे.

ज्या बोरकरांनी स्नानसोहळा, दशदिगंत, लक्षकोट, सुगंधचिंब, चित्रसृष्टी, आखातिखा, चित्रचातुरी, ब्रह्मप्रकाश, प्रसवाकुल, अनंततीर्थ व वर्णलाघव यासारखे नीटस व अर्थबहुल जोडशब्द निर्माण करून कविता तरल बनविली त्यांनीच मृगोद-कोम्दिज, मायानाटयविलास, विश्वविकाससंविद, वस्तुस्पंदनिनाद असे शब्द ठिगळ-वजा पद्धतीने वापरावेत, याचेही आश्चर्य वाटल्यावाचून राहात नाही. ही यादी आणखीही मोठी करता येईल पण रसिकांना कल्पना येण्यास दिली तेवढीही कमी नक्कीच नाही.

'चैत्रपुनव'चा संग्रह म्हणून विचार केला तर बोरकरांच्या प्रगल्भ व अनुभव-संपन्न व्यक्तित्वाच्या खुणा त्यांतील कवितातून मोठ्या प्रमाणांत व्यक्त होताना दिसतात. त्यांच्या नेहमीच्या बऱ्याच दोषांना आणि नादमधुर शब्दांच्या कवायतीला त्यांनी येथे निग्रहाने बाजूला ठेवलेले दिसते. अपरिहार्यपणे त्यांचा झालेला वापर हा आशयसंपन्न असा आहे. निसर्ग, प्रीती, दुरावा, हुरहूर, जनरीती अज्ञात प्रदेशा-तील गूढ हाकांना प्रतिसाद देणाऱ्या संवेदनाक्षम व्यक्तीची आर्तता; त्यांच्या बंदिस्त शब्दांनी यशस्वीपणे सामोरी आणली आहे.

आत्मिक समाधानाचे सूर कवितेच्या अंतरंगाला वेढून असल्यामुळेच बोरकरांची 'चैत्रपुनव' बोरकरांच्या पद्धतीची असूनसुद्धा स्वच्छ आहे; प्रकाशमान आहे.

**चैत्रपुनव : बा. भ. बोरकर : मौज प्रकाशन गृह, मुंबई : पृष्ठे १३२ : किं. ६ रु.**



बर्मा फ्रंट

# लेखांक : दोन

## कर्नल आ. भा. जाधव

# उखरूलच्या आघाडीवर

४ जुलै ४४



काल मी कंपनी कँपात परत आलो. आज मोकळाच होतो. दुपारी आरामात झोप काढली व संध्याकाळी स्नानाकरिता झोपडीबाहेर बनवलेल्या आडोशाला गेलो. आंघोळ करत असताना शेजारच्या बाशांतून मेजर कॉटमन फिल्ड टेलिफोन करताना ऐकू आलं. संभाषणात माझ्या नावाचा उच्चार आला तसे समजलोच की कोठेतरी कामगिरीवर जाण्याची गदा आस्मादिकावर आली आहे. झटपट स्नान उरकून अंगावर वर्दी (युनिफॉर्म ड्रेस) चढवून कॉटमनच्या झोपडीत गेलो नी सॅल्युट करून बोललो.

'गुड ईव्हिनिंग सर. हिअर आय ॲम. शूट '

जाड भिंगांच्या चष्म्यातून बारीक डोळे करून तोंडात खुपसलेली सिगारेट ओठांनी चाळवत मिष्किलपणे हसत ते म्हणाले–' सो यू ओव्हरहर्ड दि कॉनव्हर्सेशन. वेल, यू ॲंड जमादार काबुलसिंग आर कॉल्ड टू बटालियन हेडक्वार्टर्स इम्मीजिएटली. इट सीम्स दॅट यू बोथ आर गोईंग आऊट ऑन अे जॉब ॲंड कर्नल वॉंटस टू ब्रीफ यू बोथ पर्सनली. '

एका तासात आम्ही कर्नल रॉबर्टच्या बाशांत पोचलो. ते नकाशा उघडून टॉर्च आणि मॅग्निफाइंग ग्लासच्या साह्याने इच्छित प्रदेश न्याहाळत होते. आम्हाला उद्देशून ते म्हणाले–' आपल्या बटालियनचे स्काऊट प्लटून उखरूल रोडवर आहे. प्लटून कमांडर लेफ्टनंट बॅनर्जी व सेकंड इन कमांड जमादार उदगीराम जखमी झाले आहेत. म्हणून तुम्हा दोघांना मी तिकडे पाठवीत आहे. प्लटून या सांसेज

सारख्या दिसणाऱ्या डोंगरावर (नकाशावर दाखवत) आहे. दुष्मन त्यांचेपासून पूर्वेला सुमारे पाचशे यार्डावर आहे. प्रदेश डोंगराळ असून रस्ता अत्यंत खराब आहे. तेथे घनदाट जंगल आहे. सावधपणाने जा. या प्लटूनच्या पुढे आपली फौज नाही. तरी जपून जा. विश यू बोथ गुडलक."

ॲडजुटंट कॅप्टन बिल स्टीलच्या बाशांत जाऊन मी नकाशे, स्काऊट प्लटूनला जाणारे टपाल, जवानांची पत्रे व ऑपरेशनल एरियात जाण्याचा पास घेतला व काबुलसिंगसह कंपनीत परत आलो.

---

## ५ जुलै ४४

---


आम्ही सकाळी सहा वाजता निघालो. रात्रीपासूनच पाऊस पडायला सुरुवात झाली होती. धुक्यामुळे वीस पावलांपुढचा रस्ता दिसणंही मुष्किल झालं होतं. मी जीप अगदी मंद गतीने चालवत होतो. काबुलसिंग नकाशा उघडून बसला होता. तो नकाशा वारंवार जमिनीशी ताडून पाहात होता. दहा वाजता आम्ही इच्छित स्थळा-जवळ येऊन पोचलो.

आमचे स्काऊट प्लटून हे संपूर्ण मेकनाइझ्ड प्लटून आहे. त्यात ९ ट्रॅकड् कॅरियर्स, ६ जीप्स, ४ मशीनगन्स, चार ब्रेनगन्स, ३ टू इंच मॉर्टर्स, (उखळी) ३ पी. एट गन्स, (जवळच्या अंतरावरून टँक्सना मारायच्या बंदुका) शिवाय टॉमीगन्स, पिस्तुले, बंदुकी, ग्रिनेड डिसचार्जर कप्स आहेत ते वेगळेच. या प्लटूनचा रोल (काम) विविध प्रकारचा आहे. त्यात रेकॉनिसंस, (शत्रूच्या इलाख्याची व त्याच्या पोझिशनची पहाणी करणं) लाँग रेंज मोबाईल अँबुशिंग, (दूर अंतरावर अचानक जाऊन बेसावध स्थितीत शत्रूला कोंडीत पकडून त्याच्यावर हल्ला करणं) पायदळ पलटणींना, त्या हल्ला करत असताना जवळून वा दुरून मदत करणं किंवा आपली फौज माघार घेत असताना तिच्या व शत्रूच्यामध्ये येऊन त्याला सतावणं वगैरे प्रकारची कामे असतात.

हे प्लटून नं. १५३ ब्रिटिश पॅराशूट बटालियनच्या हुकमतीखाली होते. पोचल्या-बरोबर मी बटालियनच्या कमांडींग ऑफीसरला रिपोर्टस् केले. आपल्या फौजेने त्या भागात पकडलेल्या जागा व समोरील शत्रूच्या कब्जातील जागा त्याने मला नकाशावर व जेथे शक्य होते तेथे त्याच्या कमांडपोस्टमधून जमिनीवर दाखवल्या. एका डोंगराकडे हातातील पॉइंटर दाखवत तो म्हणाला—

'या समोरच्या पहाडावर उद्या पहाटे चार पायदळ पलटणी हल्ला चढवणार आहेत. त्यांच्या मदतीला तुझे स्काऊट प्लटून, टँकचा एक स्क्वाड्रन (चार ट्रूप्स) या हल्ल्यात भाग घेतील. या हल्ल्याच्या वेळी जमल्यास एअरफोर्सचा फायटर

## इंफाळच्या प्रदेश




पक्का रस्ता :-
कच्चा रस्ता :-
डोंगराळ प्रदेश :-
मैदानी प्रदेश :-

स्क्वाड्रनही मदतीस येईल. आज दुपारी तीन वाजता मी 'ओ ग्रुप'ला (ऑर्डर ग्रुप–हुकूम घेणारी टोळी) हल्ल्याबाबतचे हुकूम देणार आहे, त्याला तू हजर रहा.'

मी कर्नलचा निरोप घेऊन प्लटूनची पाहाणी केली. हत्यारे तपासली. उद्या लागणाऱ्या दारूगोळ्याची मागणी केली व जवानांना एकत्र करून उद्याच्या

हल्ल्याची पूर्वतयारी करण्याबाबत सूचना दिल्या. सर्व मनासारखे झाल्यावर बंकरकडे जायला निघालो, इतक्यात शत्रूच्या तोफखान्याने आमच्या पोझीशनवर गोळे फेकायला सुरुवात केली, म्हणन तेथेच जवळच्या मोर्चात आडोसा पकडण्यासाठी उडी टाकली.

## ६ जुलै ४४

आजच्या हल्ल्यांत शत्रूच्या त्या प्रचंड पहाडाचा कबजा करण्यासाठी एक जाट बटालियन, एक डोग्रा बटालियन आणि दोन टँक ट्रुप्स दक्षिणेकडून हल्ला करणार होते. फ्रॉंटियर फोर्सची एक बटालियन, ब्रिटिश पॅराशूट बटालियन आणि दोन टँक ट्रुप्स उत्तरेकडून हल्ला करणार होते. पॅराशूट बटालियनच्या एका रायफल कंपनीबरोबर माझ्या स्काऊट प्लटूनला पश्चिमेकडून या हल्ल्याला उपयोगी पडण्यासाठी फायर–सपोर्ट देण्याची कामगिरी होती. त्याबरोबरच या भागात बरीच हालचाल, खूप आवाज वगैरे करून दुष्मनवर खरा मोठा हल्ला पश्चिमेकडूनच येत आहे असा आभास निर्माण करायचा होता. मुख्य हल्ल्याचा झीरो आवर (हल्ल्याची स्टार्ट लाईन पार करण्याची वेळ) पहाटे साडे पाच वाजता होता.

ठरल्याप्रमाणे पॅराशूट कंपनी व माझे प्लटून पहाटे साडेचार वाजता पश्चिमेकडून आस्ते पहाड चढू लागले. मदतीसाठी आमच्या तोफखान्याने याच वेळेला दुष्मनवर गोळाबारी करायला सुरुवात केली. अर्धा पहाड चढून जाताच शत्रूने एकदम आमच्या दिशेने बरेच व्हेरी लाइटस् फायर करून आमच्यावर प्रकाश टाकला व जोराने फायर खोलला. त्यात दोन कॅरियर्स निकामी झाली. आम्ही मिळेल ती मोक्याची जागा पकडून शत्रूच्या दिशेने फायर सुरू केला. रात्रीच्या अंधारात कॅरियर्सच्या आवाजाला टँक्स समजून दुष्मनने आमच्यावर अँटी टँक फायर खोलला. त्यांच्या तीन टँक हंटिंग पार्ट्या लपत छपत आल्या पण पॅराशूट कंपनीच्या जवानांनी त्यांना जवळ येऊ दिले नाही. त्यांनी आमच्यावर डिसचार्जर कपमधून ग्रिनेड आणि मशीनगनचा मारा चालू केला. त्यात थोडे नुकसान झाले. अँटी टँकचा एक गोळा सरळ येऊन एका कॅरियरवर पडला. त्यात त्याचा ड्रायव्हर आणि मशीनगनर जागच्या जागी खलास झाले. त्याच्याच पाठोपाठ जरा दूर दुसरा गोळा आला, त्यात एका कॅरियरचा ट्रॅक तुटला. आता आमच्याजवळ फक्त पाच कॅरियर्स काम करण्याच्या स्थितीत राहिले. या वेळेपर्यंत फटफटू लागले. उत्तर आणि दक्षिणेकडून आमच्या फौजा पहाडावर चढताना दिसू लागल्या. विमानांनी फेरे घरून दुष्मनच्या पोझीशनवर बॉंब फेकायला सुरुवात केली. तोफखाना तर आग ओकतच होता. हे सारे पाहून दुष्मनही इरेला पेटला. त्यानेही आपली होती नव्हती तेवढी शक्ती एकवटून बदला घ्यायची तयारी ठेवली. त्याने टेन इंच आणि

घरात पुन्हा पाळणा हलण्यापूर्वी

# विचार करा

प्रथम पहिल्या मुलीची
सर्व तरतूद
नीट करायला
नको का ?



…चे दूध, सकस अन्न, कपडे, खेळणी पुस्तके व इतर अनेक लहानसान गोष्टी या सर्वांची निश्चित तरतूद …साठी करणारच. आणि हे सर्व सोपे नसले तरी कसेही करून तुम्ही ते पुरवाल. पण इतक्यातच आणखी … जबाबदारी वाढली म्हणजे ? अशी वेळ येऊ न देणे हेच योग्य नाही काय ?

… लक्षावधि जोडपी हेच करीत आहेत. ती परिस्थिति अनुकूल होईपर्यंत दुसरे मूल होणे पुढे ढकलतात. निरोध … तुम्हालाहि हे सहज करता येईल. निरोध हे जगातील फार लोकप्रिय असे, पुरुषांनी वापरायचे खात्री … साधन आहे. लक्षात ठेवा पाळणा लांबविण्याचा सर्वात सोपा व बिनधोक मार्ग म्हणजे निरोध अनेक … यशस्वी रीत्या अनुसरलेला आहे. मग तुम्हीहि निरोध का नाही वापरीत ?

… मिळते. फक्त 15 पैशांला 3 (सरकारी मदतीने).




लांबविण्यास पाळणा, उपाय साधा. सोपा आपला

# निरोध ▼

लक्षावधींच्या पसंतीचे साधे. बिनधोक संतति-प्रतिबंधक!

केमिस्ट, वाणी, जनरल स्टोअर्स, पानाची गादी वगैरे अनेक ठिकाणी सहज उपलब्ध.

davp 71/110

फोर इंच मॉर्टर्स, (उखळी तोफा) नंबर थर्टी सेव्हन मिलीमिटर गन्स, ग्रिनेडस वगैरेंचा पहाड चढणाऱ्या सैनिकांवर वरून जोराचा मारा चालू केला. आमच्या सैनिकांना हल्ला चढवायचा असल्याने पहाड चढतांना कष्ट पडत होते. रिस्क घ्यावी लागत होती. या उलट दुष्मन चांगल्या मोक्याच्या सुरक्षित जागा पकडून वर चढून येणाऱ्या जवानांचे लीलेने नुकसान करू शकत होता. आमचे बहाद्दर जवान तसेच निकराने वर चढत होते. त्यातले कैक धारातीर्थी पडत होते, घायाळ होत होते, रक्तबंबाळ होत होते. शेवटी तर लढाई अगदी शिगेला पोचली. हँड टू हँड फाइट सुरू झाली. शत्रूच्या पिछाडीकडून अकस्मात सेवंथ कॅव्हलरी रेजिमेंटची हलकी स्टुअर्ट टँक्सही चढली. त्यांनी एका पाठोपाठ एक बंकर उडवायला सुरुवात केली. जवळ जवळ दहा बारा बंकर्सना आगी लावल्या. दोन्ही पक्षांचे अतोनात नुकसान होत होते. शेवटी आमची फत्ते झाली. पहाडाचा कबजा मिळाला. शत्रू घेऱ्यांत सापडला. त्याच्या उत्तर, दक्षिण आणि पूर्वेकडील पळण्याच्या वाटा बंद झाल्या. त्याने पश्चिमेकडे पळ काढला. अर्ध्या पहाडापर्यंत त्याला उतरू देऊन आधीच मोक्याच्या जागा पकडून सज्ज असलेल्या माझ्या प्लटूनच्या मशीनगन्स, ब्रेनगन्स आणि रायफल्सच्या माऱ्यांत तो सापडला. जवळजवळ सत्तर ऐंशी डोकी तेथे मारली गेली. उरलेल्यांचा समाचार पॅरा कंपनीने घेतला. आमच्या जवानांनी फार उत्तम कामगिरी बजावली.

या भागात हा पहाड सर्वांत उंच आणि चांगला लंबा चवडा आहे. या प्रदेशात त्याचा मोठा दरारा आहे. हा जबरदस्त पहाड आमच्या कबजात आल्यामुळे दुष्मनला एका दमात १८ मैल मागे हटावे लागले.

हा विजय मिळवायला आम्हाला दोनशेच्यावर मोहरे गमवावे लागले. दुष्मनची संख्या ६०० वर गेली.

या भागात दुष्मनच्या चार ब्रिगेडस आहेत. दोन जपानी ब्रिगेडस आणि इंडियन नॅशनल आर्मीच्या ' आझाद ' आणि ' बोस ' या दोन ब्रिगेडस. आता दान पलटले आहे. गेले तीन महिने आमची सेना घेऱ्यात होती. आता या चारी ब्रिगेडस घेऱ्यात आहेत. त्यांचे अपरिमित नुकसान होत आहे. त्यांची लाईन ऑफ कॉम्युनिकेशन ताणली गेली आहे. हवाई मार्गाने पुरवठा करण्याची त्यांच्याजवळ सोय नाही. खुष्कीच्या मार्गाने पोचवलेलं सामान त्यांच्या पदरात पूर्ण पडत नाही. काही विशिष्ट कारणांमुळे आय. एन. ए. आणि जपानी सेना यात वितुष्ट येऊ लागले आहे. उरलेल्या भागातील दुष्मन आता जवळ जवळ नेस्तनाबूत झाल्यासारखाच आहे.

# दिवाणबहादूर

**१० जुलै ४४**



उखरूल भागातील आमचे काम संपल्यामुळे आज दुपारी तीन वाजता मी स्काऊट प्लटून इंफालला घेऊन आलो. उखरूल आघाडीवरून माझ्याबरोबर एक पाहुणेही आले आहेत. त्यांचं नाव ? ' दिवाण बहाद्दुर ! ' ४ जुलैला मी जेव्हा उखरूलला पोचलो तेव्हा प्लटूनची तपासणी करून माझ्या बंकरकडे जात असताना दुष्मनच्या तोफखान्याने एकदम बंबारी सुरू केली. सर्वांनी तात्काळ मोर्चांत उड्या टाकल्या. मीही जवळच्याच एका मोर्चात उतरलो. त्याच क्षणाला एक बंदर पलीकडून उड्या मारत आले नी त्यानेही त्याच मोर्चात उडी मारली. मी चांगलाच चपापलो आणि रिव्हॉल्व्हर हातात घेऊन ट्रिगर गार्डवर बोट ठेवून नेम घेतला तर ते बंदर भीतीने थरथर कापत असलेले दिसले. माझ्या चटकन लक्षात आले की या तोफखान्याच्या आवाजाला ते भ्याले असावे व इतर लोक आडोसा पकडत आहेत ते पाहून हेही आले. मोठे गोजीरवाणे चिटुकले बंदर होते ते. मी दोन्ही गुढग्यांवर टेकून मोर्च्याच्या भितीवर कोपरा ठेवून पोझीशन घेतली. त्यानेही माझे अनुकरण केले. आजूबाजूला काय वाताहात झाली ते पाहाण्यासाठी मी डोके बाहेर काढले तर यानेही आपले मुंडके बाहेर काढले. मी मोर्चात पाठ टेकून खाली बसलो तर ही स्वारीपण बसली. तेव्हा मला वाटलं की हे माकड नक्कीच कोणा मदाऱ्याचे असावे. ते फार चाणाक्ष आणि नक्कल वठवण्यात पटाईत होतें. या लढाईत मालकाची बहुतेक वाताहात झाली असेल आणि हे बिचारे कुठेतरी आपला गुजारा करीत आहे. माझी हॅवरसॅक उघडून त्यातील एक पराठा मी त्याला दिला. त्यानं तो चटकन खाल्ला. मी वॉटरबॉटल खोलून मगमध्ये पाणी ओतले व मग तोंडाला न लावता थोडा वर धरून दोन घोट पाणी प्यालो आणि मग त्याच्यापुढे धरला, तर हुबेहूब माझी नक्कल करत स्वारी पाणी प्याली. मला त्याच्याबद्दल प्रेम वाटू लागले. तोफखान्याची गोलंदाजी बंद झाल्यावर मोर्चाबाहेर येऊन मी प्लटूनचे कोठे काही नुकसान झाले की काय ते फिरून पाहू लागलो तर ही स्वारीपण माझ्या मागोमाग फिरू लागली. साऱ्या जवानांना गम्मत वाटली. इतक्यात कोठे-

तरी ग्रिनेड फुटल्याचा आवाज झाला तशी या स्वारीने चटकन जवळच्या मोर्चात उडी घेतली. सारे जवान हसायला लागले. जमादार काबुलसिंग म्हणाले--'वाह रे बेटे ! बहोत बहादर हो तुम. ' सारे खूप हसले. मी म्हटलं. ' नही साब, देखो कैसा कांप रहा है. यह तो बहादुरोंका भी दीवान है. हम इसको ' दिवाण बहादुर ' पुकारेंगे.

मी ऑर्डली रणजितसिंगला एक छोटा बंकर खोदायला सांगून दिवाण बहादुरची तेथे रहाण्याची सोय करायला सांगितली. दिवाणला मी म्हटलं- ' चलो दोस्त. अबसे तुमही हमारे साथी बन जाव. '

## ११ जुलै ते २५ ऑगस्ट ४४

इंफालला आल्यावर स्काऊट प्लटून लेफ्टनंट काननच्या ताब्यात देऊन मी ब्रिगेड हेडक्वार्टर्सला गेलो. तेथे ज्युनियर ऑफिसर्स आणि एन. सी. ओजकरता तीन आठवड्यांचा वेपन ट्रेनिंग कोर्स चालवण्यासाठी माझी नियुक्ती झाली. कामाव्यतिरिक्त माझा वेळ दिवाण बहादुरशी खेळण्यात जाई. त्याच्या सद्वर्तणुकीमुळे ब्रिगेड कमांडरच्या ऑफीसपर्यंत त्याची पोच होती.

ब्रिगेडियरने त्याला डी. बी. अशी हाक मारायला सुरुवात केली, तेव्हा सर्वजण त्याला डी. बी.च म्हणत. ब्रिगेडियरचा गुरखा ऑर्डर्ली समशेर बहाद्दूर थापा डी. बी.ची उत्तम बडदास्त ठेवी. त्यानं डी. बी.साठी बांबूचं एक छोटं खाटलं बनवलं. त्याला झोंपण्यासाठी एक गादी बनवून घेतली. युनिफॉर्म बनवला. त्याला तो अंडी, पाव, लोणी खायला घाली. त्याला मार्चिंग, सॅल्युटिंग, राईट टर्न, लेफ्ट टर्न, अबाऊट टर्न वगैरे शिकवलं. डी. बी. रोज ब्रिगेडियरच्या ऑफीसमध्ये जाऊन त्याला सॅल्यूट करी. ब्रिगेडियर त्याला- ' गूड मॉर्निंग डी. बी. हॅव ए सीट ' म्हणून समोरच्या खुर्चीकडे हात दाखवी. डी. बी. खुर्चीवर बसल्यावर त्याला एक बिस्किट खायला देई. डी. बी. व्यवस्थित मोठ्या माणसांसारखं तोंड मिटून मचमच न करता खाई. रुमालाने तोंड पुसे. ब्रिगेडियरने दिलेल्या फाईल्स पत्रे वगैरे ब्रिगेड मेजर किंवा डी. क्यू. या स्टाफ ऑफिसरांना नेऊन देई. ब्रिगेडियरला सर्वजण सलाम् करतात व येथे तो कोणीतरी बडा माणूस असावा हे डी. बी. च्या लक्षात आल्यापासून तो सतत ब्रिगेडियरच्या आजूबाजूलाच असे. ब्रिगेडियर जीप घेऊन बाहेर निघाला, की डी. बी. टुणकन उडी मारून मागच्या सीटवर बसे. ब्रिगेडियरलाही डी. बी. ची कंपनी आवडायची. वेळ मिळेल तेव्हा तो डी. बी. शी सतत काही ना काही बोलत रहायचा. डी. बी. ला किती समजायचं कोण जाणे, पण तो त्याची सारी कामं व्यवस्थित करायचा. मला आणि रणजीतला मात्र डी. बी. आता जुमानेसा झाला.

ब्रिगेड हेडक्वार्टर्सला मी चालवत असलेला कोर्स संपायला दोन दिवस उरले असताना, डेहराडूनच्या टॅक्टिकल अँड अॅडमिनिस्ट्रेशन ट्रेनिंग स्कूलमध्ये ज्युनियर टॅक्टिकल कोर्स करण्यासाठी माझी निवड झाली. हा कोर्स १ सप्टेंबर ते १५ नोव्हेंबरपर्यंत होता. कोर्स संपल्यावर मला पंधरा दिवसांची 'वॉर लीव्ह' मिळणार होती. मायदेशाला जायला मिळणार, आप्तस्वकीय भेटणार म्हणून मला खूप आनंद झाला. ब्रिगेड हेडक्वार्टर्सचा कोर्स संपवून मी कंपनीत मेजर कॉटमनच्या मार्गदर्शनाखाली १५ दिवसांचे कोर्स ट्रेनिंग घेतलं. डी. बी. ब्रिगेड हेडक्वार्टर्समध्येच राहिला. तो माझ्याबरोबर यायला राजी नव्हता.

२७ ऑगस्टला मी भारतात जायला निघालो. पण निघण्यापूर्वी २६ ऑगस्टला एक विस्मयजनक झुंज मी पाहिली नि डोळ्यांचं पारणं फिटलं. ती कथन केल्या-वाचून मला रहावत नाही. (क्रमशः)

---

सप्रेम नमस्कार

'माणूस'चा १५ ऑगस्ट अंक आज मिळाला. माझा लेख वाचून झाल्यावर एक-दोन महत्त्वाच्या चुका निदर्शनास आल्या.

१. पहिल्या प्रकरणाचे नाव सप्टेंबर १९३१ ते मार्च १९४४ असे छापले गेले आहे. त्याऐवजी ते सप्टेंबर १९३९ ते मार्च १९४४ असे हवे.

२. पृष्ठ ४७ वरील २३ मार्च ४४ च्या मजकुरात 'अँग्लो बर्मन बाई मिसेस रॅबीट व तिच्या मुली लिली आणि ज्युली' यांच्या संबंधीचा मजकूर न आल्याने पुढे येणाऱ्या लिली-डीन प्रकरणाचा नीट संबंध लागत नाही. —कर्नल आ. भा. जाधव

पृष्ठ ४७ वरील २३ मार्च ४४ या मजकुरातील शेवटचा परिच्छेद असा—


"रात्री अंकलनी आम्हाला चौरंगीवरील रंगून रेस्टॉरंटमध्ये जेवायला नेलं. मंद निळसर विद्युत् प्रकाशात, हिरव्या रंगसंगतीने सजवलेल्या त्या आकर्षक छोटेखानी उपहारगृहात शिरताना मन उल्हसित झालं. एक अँग्लो बर्मन शरणार्थी स्त्री मिसेस रॅबीट ते रेस्टॉरंट चालवीत होती. अय्यंगारना पाहून तिनं कौंटरवरून स्मित केलं नी 'हॅलो अंकल' असं हळुवारपणं म्हटलं. अंकलनीही 'हॅलो, मार्गारेट, हौ आर यू ? व्हेअर आर लिली अँड ज्युली ?' म्हणून विचारले. डीननं चटकन कान टवकारून नुसत्या डोळ्यांच्या खुणेनेच 'या कोण ?' अशा अर्थाचा प्रश्न फेकला. अॅश ट्रेमध्ये सिगारेट विझवीत नेहमीप्रमाणे डोळे मिचकवीत अंकल म्हणाले— 'मार्गारेटस डॉटर्स, माय सन.' अंकलची नी या कुटुंबाची चांगलीच ओळख दिसली. थोड्या वेळाने तिघीही अंकलजवळ आल्या. रीतसर ओळख झाल्यावर डीनने हातपाय पसरले नी या तिघींशी दोस्ती बांधली. उद्या संध्याकाळी फिरपो या आलिशान हॉटेलात डिनर अँड डान्सला या तिघींना आमंत्रण देऊन बसली स्वारी. उद्याचा झकास बंदोबस्त झाला म्हणून डीन खुषीत होता.

रात्री डिलाईटमध्ये 'फँटम ऑफ ऑपेरा' सिनेमा पाहिला."

[ हा मजकूर मूळ हस्तलिखितात होता पण चुकीने गाळला गेला. क्षमस्व. सं. ]

CMI-1937

# थोर वारसा



तुमच्या कुटुंबियांना तुम्ही दिलेली प्रेमाची सुंदर भेट— एसीसी सीमेंटमध्ये बांधलेले घर. ते वर्षानुवर्षे, पिढ्या न् पिढ्या तुमच्या कुटुंबियांना आसरा, ऊब आणि आराम देत राहील.

तेव्हा, आत्ताच विचार करा. काही वर्षांनी तुमच्याबद्दल त्यांना खचितच कृतज्ञता वाटेल.

तुम्हाला लागणारे सीमेंट मिळविण्यासाठी तुमच्या नजीकच्या **ए सी सी** स्टॉकिस्टचा अथवा दि सीमेंट मार्केटिंग कंपनी ऑफ इंडिया लिमिटेड, १२१, महर्षी कर्वे मार्ग, मुंबई २०, यांचा संपर्क साधा.

**तज्ञांची मोफत तांत्रिक मदत** दि कॉंक्रीट असोसिएशन ऑफ इंडिया, १२१, महर्षी कर्वे मार्ग, मुंबई २०, यांचेकडून मिळेल.

**दि असोसिएटेड सीमेंट कंपनीज लिमिटेड**
**दि सीमेंट मार्केटिंग कंपनी ऑफ इंडिया लिमिटेड**

**ACC**
**शेतकऱ्यांचा सखा**

ह्या शेवटच्या सतरा वर्षांत मॉमच्या निकट सान्निध्यात आला. त्याने वाचकांचा विश्वासच बसणार नाही अशा मॉमच्या अस्ताला जाण्याच्या काळातल्या आठवणी लिहून ठेवल्या आहेत. मॉम शेवटी किती कमालीचा विकृत आणि विवेकहीन झाला होता त्याची ही एक झलक आहे :

नव्वदीच्या घरात पोचलेल्या म्हाताऱ्या मॉमला एका हौशी परिचित बाईने मेजवानीला बोलावलं. मॉम येणार म्हणून अनेक मोठे लोक अगत्याने उपस्थित राहिले. मॉम मेजवानीला गेला. रीतीप्रमाणे यजमानीणबाईंनी वृद्ध मॉमच्या गालाचा पापा घेतला. मॉमने तिच्याकडे रोखून पाहिलं आणि सर्वांसमक्ष तिला सांगितलं, 'किती गुटगुटीत आहेस ग तू ! आत्ता तू तुझे कपडे इथल्या इथे उतरव. मला तुला निसर्गावस्थेत पहायचं आहे !' यजमानीणबाई शरमिंद्या झाल्या. मॉमने दरडावलं, 'जर तू कपडे उतरवले नाहीस, तर मी मेजवानीला जेवणार नाही !' शेवटी मॉमच्या शांत सेक्रेटरीने मध्यस्थी केली. मॉम शांत झाला. मेजवानी उरकून मॉम बंगल्यावर परत आला आणि ढसाढसा रडला. हुदके देत म्हणाला, 'मी जाईन तिथे अपयश माझा पाठलाग करतं ! नको हे शापित जीवन यापुढे. एकही गोष्ट मला धड जमत नाही म्हणजे काय ?'

मॉम कोटयाधीश झाल्यानंतरची दुसरी गोष्ट. तो रॉबीनला म्हणाला, 'पैसा हे मानवाचं सहावं इंद्रीय आहे. हे सहावं इंद्रीय नसेल, तर सृष्टीने दिलेल्या पंचेंद्रियांचा माणूस काहीही उपयोग करू शकणार नाही.' मग ते दोघे एक डॉक्टरकडे गेले. तिकडून परततांना आजारी असलेला मॉम बसच्या रांगेत तिष्ठत उभा राहीला, पण त्याने टॅक्सी करण्याची चैन भोगली नाही. इतकंच नव्हे, तर बरोबर नेलेल्या आजारी माणसालाही त्याने बसच्या रांगेत तिष्ठत उभं ठेवलं. मात्र ह्यावरून मॉम चिक्कू होता असं म्हणता येणार नाही. कारण त्याने लाखो रुपये खर्चून मोठमोठ्या चित्रकारांच्या कलाकृती विकत घेतल्या होत्या. अर्थात, हा हव्यास म्हणजेसुद्धा न्यूनगंडाचाच उद्रेक होता. लोकांची आणि कलावंतांची, अशी दोघांचीही प्रशंसा मिळविण्याचा हा त्याचा खटाटोप होता.

आपल्या घरी येणारा प्रत्येक लेखक, मग तो बाहेरच्या जगातला केवढाही धुरंधर असो, ह्य धडपडणारा, जेवणाखाणाचे वांधे असणारा आणि अडचणीत सापडलेलाच आहे असा मॉमचा ग्रह असे. त्यामुळे कुणीही लेखक येणार असला की मॉम आचाऱ्याला निक्षून सांगे, 'लक्षात ठेव, आज तो फलाणा फलाणा साहित्यिक पंक्तीला येणार आहे. गेल्या बऱ्याच दिवसांचा तो उपाशी आहे. त्याला पंचपक्वांन्नांचंच जेवण आग्रह कर-करून वाढायचं.' पाहुणे आले, की मॉमकडच्या आग्रहाने

हैराण होत ! ते गेले की मॉम घरच्या मंडळींना सांगे, 'पाहिलंत, भूकेने केवढा व्याकुळलेला होता तो ?' एकदा एका कोट्याधिशाची बायको त्याच्याकडे मेजवानीला आली. सर्व श्रीमंत पाहुण्यांच्यासमोर मॉम तिला म्हणाला,

'बाई, तुमच्या दुःखाबद्दल मला सहानुभूती वाटते.'

'दुःख ? कोणतं दुःख ?' त्या बाईने विचारलं.

'तुमच्या यजमानांचं दिवाळं वाजलं, त्याच.'

'छे छे ! आमचं दिवाळं वाजलेलं नाही.'

'मी सांगतो ना, तुमच दिवाळं वाजलेलं आहे नि ही गोष्ट तुम्ही लपवून टेवताहात.'

'नाही हो, तुमचा गैरसमज झालाय.'

'माझा गैरसमज कधीच होत नसतो. मी पुराव्यानिशी शाबीत करेन की तुमचं दिवाळं वाजलेलं आहे. पण असो. आता, आणखी चारचौघांत ती शोभा नको !'

त्या बाईला मेल्याहून मेलं झालं. तिचं दिवाळं वाजलेलं नव्हतं. पण चारचौघात तिचा पाणउतारा करण्यात त्या विकृत आनंदावर न्यूनगंडाने पछाडलेल्या मॉमने झडप घालून घेतली !

नव्वदीच्या घरात आल्यावर आत्महत्येचे विचार मॉमच्या डोक्यात घोळू लागले. रॉबीनला तो सांगू लागला, 'काय मिळवलं मी ? मला भेटलेल्या प्रत्येक माणसाने अखेर माझा तिरस्कारच केला. इतकी इस्टेट केली मी, पण जाताना वेलीवरचं एक फूलसुद्धा माझी सोबत करणार नाही. काय अर्थ आहे माझ्या जग-


# व्होल्गा जेव्हा लाल होते

ले. : वि. स. वाळिंबे

मूल्य : अठरा रुपये

राजहंस प्रकाशन

ण्याला ? खरं म्हणजे राजीखुषीच्या आत्महत्येला सरकारने विनाअट परवानगी दिली पाहिजे.'

आत्महत्येची गरजच उरली नाही. लेखनावर लाखो रुपये मिळवलेला एकाकी मॉम सोळा डिसेंबर एकोणीसशे पासष्ट साली वयाच्या ब्याण्णवाव्या वर्षी वृद्धापकाळामुळे महानिद्रेच्या स्वाधीन झाला.

अशा ह्या चमत्कारिक मनोव्यथांनी पछाडलेल्या सॉमरसेट मॉमला एक आजी होती. तिचं नांव होतं ॲन. दिर्घायुष्याचा शाप वाटावा इतकं प्रदीर्घ आयुष्य तिच्या वाटचाला आलेलं होतं. फ्रान्समधल्या ल मान्स ह्या लष्करी ठाण्याच्या गावी ती एकाकी अगतिक जीवन ढकलीत होती. अर्थात, अशा अनेकांच्या अनेक आज्या असतात. त्यांत लिहिण्यासारखं ते काय आहे ?

आहे; सांगतो. लोकप्रियतेच्या शिखरावर कायमचा मुक्काम करून बसलेल्या मॉमची ही ॲन आजी स्वतः एक लेखिका होती. तिच्या नावावर कुमारांसाठी लिहिलेल्या बारा कादबऱ्या होत्या – नि इथूनच बिघडायला सुरूवात झाली. जगातल्या जवळ जवळ प्रत्येक प्रगत भाषेत ज्याचं साहित्य भाषांतरित झालेलं होतं, आणि राजे रजवाडे ज्याच्या पंक्तीला बसण्यात धन्यता मानीत असत, त्या मॉमला आपल्या सख्ख्या आजीचा दुःस्वास वाटू लागला. आपल्या घराण्यात आपल्या आगोदर कुणी लेखनकार्य केलं हा विचारच त्याला असह्य झाला. तिची फार इच्छा होती, की आपल्या नातवाने आपल्या गोष्टी वाचाव्यात. पण नातू तर आजीचं एकही अक्षर वाचणार नाही अशी शपथ घेऊन बसला होता. मॉमने आजीच्या बारा कादंबऱ्यांपैकी एक ओळही वाचली नाही ! इतकंच नव्हे, तर इतक्या प्रदीर्घ जिप्सी आयुष्यांत मॉम तिला एकदाही भेटला नाही ! ती वारवार पत्र पाठवी. पण मॉमने ढीम केलं नाही. आजीला म्हातारवयात नाना व्याधी जडल्या. तिचे सांधे सुजले. हातापायांना सूज आली. ती ज्या लष्करी ठाण्यात राहात होती तिथे कैद्यांना सतत हाणामारी होई. अनेक वेळा कैद्याना उघड्यावर गोळी घालून ठार मारण्यात येई. त्या भयानक प्रकाराच्या हकीगती आजीच्या कानावर पडत. त्या क्रूरकथा ऐकून तिच्या जीवाचा थरकाप उडे. रक्तदाब उसळे. पैशाच्या अभावी तिने हातउसन्या रकमा काढल्या. त्या फेडणंही तिला अशक्य झालं. अठ्ठ्याऐंशीव्या किंवा एकूणनव्वदाव्या वर्षी तिने उसने काढलेले पैसे ती कोणत्या मार्गाने फेडणार होती ? आणि इकडे मॉमला वारस नसल्यामुळे त्याचा पैसा बँकेत चक्रवाढ व्याजाने वाढत जाऊन नुसता तुंबत होता ! दाही दिशांतून त्याला मानधन मिळत होतं पण त्यातला फुटका छदामही मॉमने आजीच्या हातावर टेकवला नाही. कुणी मदत करील काय म्हणून नव्वदीच्या उंबरठ्यावरली ती वृद्ध लेखिका वाट पहात होती. नातवावर तर तिचा हक्कच होता. मॉमने मात्र तिची घोर उपेक्षा केली. पैसे दूर राहोत, पण एकाच फ्रान्समध्ये राहाणाऱ्या मॉमने तिची साधी वास्त-

पुस्तसुद्धा कधी केली नाही. तिने मॉमच काहीही घोडं मारलेलं नव्हतं. किंबहुना, ते तिच्या शक्तिबाहेरचंही होतं.

लेखणीचा प्रताप विचारात घेतला तर मॉम सातासमुद्रांवर सत्ता असलेला मर-दार होता. तो साधी फूंक मारता तरी आजीच्या बारा कादंबऱ्या क्षणार्धात कोलमडून पडल्या असत्या. तशा त्या खुद्द आजीच्या हयातीतच विस्मृतीच्या उंच ढिगाऱ्याआड गाडल्या गेल्याच होत्या. पण मॉमने ना घेतली फूंक मारायची तसदी की ना दिला त्या गरजू म्हातारीला प्रेमाचा हात ! आणि विरोधाभासाची गोष्ट अशी आहे की मॉमला दानतशून्य लेखक म्हणावं, तर ह्याच मॉमने आपल्या संपत्तीचा धर्मदाय निधी उभारून त्याच्या व्याजातून उदयोन्मुख लेखकांना विश्वसंचारासाठी शिष्यवृत्त्या ठेवल्या ! अत्यंत भयानक आणि उपेक्षेच्या अवस्थेत ॲनआजी बेवारसी म्हणून मरण पावली. मरतेसमयी तिच्यापाशी फुटका मणीही नव्हता. तिचे ऋणको आले आणि तिच्या घरातलं हाती लागलं ते गाडगं-मडकं घेऊन मोडीत काढायला गेले. मॉम आपल्या प्रासादात उंची मद्याचे पेले झोकत थंड डोक्याने रहस्यकथा वाचीत बसला. आजीची मरतेसमयीची एकमेव इच्छा होती की तिला ज्या थडग्यात पुरण्यात येईल त्या थडग्यात आणखी कुणाला पुरण्यात येऊं नये. तिची महानिद्रा तिला एकट्यानेच भोगायची होती. पण त्यासाठी जो खास पैसा द्यावा लागतो तो तिच्यापाशी नव्हता. तेव्हां तिला गाडल्यानंतर चार वर्षांनी खड्डा पुन्हा उकरण्यात आला. आजीची हाडं बाहेर फेकण्यात आली आणि रिकाम्या झालेल्या खड्ड्यात दुसऱ्या माणसाला जागा करून दिली गेली ! मॉम तेवढा पैसा देता तर आजीची इतकी विटंबना होती ना. पण त्याने औदार्य दाखवले नाही. प्रश्न असा आहे की मॉमच्या ऐश्वर्यसंपन्न जीवनातून त्याची अव्वल दर्जाची साहित्यसेवा वजा केली, तर बाकी काय उरतं ?



राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक **श्री. ग. माजगावकर** यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव पेठ, पुणे ३० येथे छापून १०२५ सदाशिव पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. **सं. श्री. ग. माजगावकर**

# नाझी

## भस्मासुराचा उदयास्त

लेखक : वि. ग. कानिटकर

मूल्य : रुपये पंचवीस

**ग्रंथ प्रसिद्ध झाला.**

* ज्या पूर्वग्राहकांनी डाकव्यय रुपये दोन जमा केलेला नसेल त्यांनी आपापल्या प्रती कार्यालयातून दुपारी १२ ते ६ या वेळात घेऊन जाण्याची कृपा करावी. सोबत पावती असावी.

* ज्या पूर्वग्राहकांनी डाकव्यय जमा केलेला आहे त्यांचेकडे ग्रंथ ' रजिस्टर्ड बुक-पोस्ट 'ने शक्यतो लवकरच पाठविण्याची व्यवस्था होत आहे.

**व्यवस्थापक, राजहंस प्रकाशन**

१०२५ सदाशिव पेठ, पुणे ३०.